# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक – २४
## सभावृत्तांत

**दिनांक – २०.११.२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे नोंव्हेबर - २०१८ ची मा. महापालिका सभा मंगळवार दिनांक २०/११/२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव उपमहापौर

२) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

३) मा.वसंत प्रभाकर बोराटे

४) मा. नितीन ( आप्पा ) प्रताप काळजे

५) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

६) मा.गायकवाड निर्मला मनोज

७) मा.सागर बाळासाहेब गवळी

८) मा.गोफणे अनुराधा देविदास

९) मा.बारसे प्रियांका प्रविण

१०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

११) मा.लांडगे सारिका संतोष

१२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१६) मा.फुगे भिमाबाई पोपट

,

१७) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१८) मा.सावळे सिमा रविंद्र

१९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२०) मा.लांडे विक्रांत विलास

२१) मा.गीता सुशिल मंचरकर

२२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२४) मा.अनुराधा गणपत गोरखे

२५) मा.मंगला अशोक कदम

२६) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२७) मा.अश्विनी भिमा बोबडे

२८) मा.संजय बबन नेवाळे

२९) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३०) मा.भालेकर प्रविण महादेव

३१) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३२) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३३) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३४) मा.घोलप कमल अनिल

३५) मा.पवळे सुमनताई मधुकर

३६) मा.जावेद रमजान शेख

३७) मा.यादव मीनल विशाल

३८) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३९) मा.राजू मिसाळ

४०) मा. शैलजा अविनाश मोरे

४१) मा.बाबर शर्मिला राजू

,

४२) मा.अमित राजेंद्र गावडे

४३) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४४) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४६) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४७) मा.ढाके नामदेव जनार्दन

४८) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४९) मा.करुणा शेखर चिंचवडे

५०) मा.भोईर सुरेश शिवाजी

५१) मा.अपर्णा निलेश डोके

५२) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५३) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५४) मा.जयश्री वसंत गावडे

५५) मा.कोमल दिपक मेवानी

५६) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५७) मा.सुलक्षणा राजू धर

५८) मा.सुजाता सुनिल पालांडे

५९) मा.कदम निकीता अर्जुन

६०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६१) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६२) मा.पाडाळे निता विलास

६३) मा.काळे उषा दिलीप

६४) मा.कोकणे संतोष अंकुश

६५) मा.पवार मनिषा प्रमोद

६६) मा.बारणे अर्चना तानाजी

,

६७) मा.अभिषेक गोविंद बारणे

६८) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६९) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

७०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७१) मा.बारणे माया संतोष

७२) मा.निलेश हिरामण बारणे

७३) मा.कलाटे राहुल तानाजी

७४) मा.कलाटे मयूर पांडुरंग

७५) मा.ममता विनायक गायकवाड

७६) मा.कामठे तुषार गजानन

७७) मा.चोंधे आरती सुरेश

७८) मा.कस्पटे संदिप अरुण

७९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८०) मा.सविता बाळकृष्ण खुळे

८१) मा.सुनिता हेमंत तापकीर

८२) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८३) मा.कुटे निर्मला संजय

८४) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८५) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८६) मा.आंगोळकर सागर सुनिल

८७) मा.मुंढे उषा अंकुश

८८) मा.कदम शशिकांत गणपत

८९) मा.लोखंडे चंदा राजू

९०) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९१) मा.आशा धायगुडे-शेंडगे

,

९२) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९३) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

९४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९७) मा.नवनाथ दत्तू जगताप

९८) मा.संतोष बबन कांबळे

९९) मा.सोनवणे शारदा हिरेन

१००) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१०१) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०२) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर - आयुक्त, मा.पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त(२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.निकम, मा.सवणे-प्र.सहशहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.इंदलकर, मा.झगडे-सहा.आयुक्त, मा.राऊत- प्र.सहा.आयुक्त, मा.शिंदे- प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.कुलकर्णी, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.भोसले -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

(सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर सभागृहात उपस्थित नसल्याने मा.उपमहापौर यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा. उपमहापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.
**मा.नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. मा. महापौर साहेब येणा-या ३१ तारखेला आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेचे विशाल कांबळे, कार्यकारी अभियंता या पदावरुन सेवानिवृत्त होत आहेत. तरी त्यांचा या महापालिका सभेमध्ये आपण सन्मान करण्यात यावा अशी मी विनंती करतो.

**मा. विलास मडिगेरी –** मा.महापौर साहेब, सुचनेला मी अनुमोदन देतो**.**

,

**मा. उपमहापौर –** श्री. विशाल कांबळे यांचा सत्कार करणेत यावा.

(मा.विशाल कांबळे, कार्यकारी अभियंता यांचा सत्कार मा.महापौर, मा.आयुक्त आणि सर्व उपस्थित सन्मा. पदाधिका-यांच्या हस्ते करणेत आला.)

**मा. मडिगेरी विलास -** मा. महापौर साहेब, अनंतकुमार- भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते तथा केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री, मेजर चांदपुरी-१९७१ चे भारत - पाकिस्तान युध्दात अतुलनीय पराक्रम गाजविलेले, आबा अभ्यंकर - रा.स्व. संघाचे जेष्ठ प्रचारक, प्रसाद बेंद्रे - सिमा सुरक्षा दलाचे अधिकारी, कॉम्रेड माधवराव गायकवाड - जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी व भाकपचे नेते माजी आमदार, डॉ. युवराज घाटोळे - थेरगावमधील नामवंत ह्दयरोग तज्ञ, कपिल गुंड - श्रीगोंदा तालुक्यातील जम्मू काश्मीरमध्ये शहीद झालेले वीर जवान, मारुतराव साखरे - जेष्ठ हार्मोनियम वादक, बाळासाहेब महादु ननावरे - मनपा सुरक्षा रखवालदार व माजी सैनिक, बापुसाहेब हांडे - ह.भ.प. पिंपळे गुरव, भाऊसाहेब यशवंत बारणे - थेरगाव, प्रभाग क्रमांक २३, यांचे निधन.

भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते तथा केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री अनंतकुमारजी यांचे दि.१२ नोंव्हेबर रोजी बेंगलोर येथील हॉस्पिटलमध्ये अल्पशा आजाराने निधन झाले त्यांचे बाबतीत सांगायचे म्हटले तर अखिल भारतीय विदयार्थी परिषदेचे ते चांगले पदाधिकारी होते. सन १९७५ च्या आणीबाणीच्या काळामध्ये त्यांना तुरुंगवास झाला होता. त्याचबरोबर शिक्षणाने ते ग्रॅज्यूएट आर्टसचे लॉचे पदवीधर होते. त्याचबरोबर अखिल भारतीय विदयार्थी परिषदेचे अतिशय चांगले काम त्यांनी त्यांच्या काळामध्ये केले. त्याचबरोबर राष्ट्रीय स्वयंसंघाचे काम केले. सन १९८७ साली त्यांनी भारतीय जनता पार्टीला जॉईन केले. त्याचबरोबर भारतीय जनता पार्टीचे कै.भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकालामध्ये सर्वात लहान तरुण केंद्रीय मंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. वायूसेना विभागाचे त्यांनी कामकाज पाहिले. ते सलग सहा वेळा लोकसभेचे खासदार म्हणून त्याठिकाणी ते निवडून आले. तरी या सर्वाना आजच्या सभेमध्ये श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो, त्याचबरोबर ही सभा श्रध्दांजली वाहून पुढील महिन्याच्या २० डिसेंबर २०१८ दुपारी १.०० पर्यंत तहकूब करावी अशी सूचना मी मांडतो.

**मा. ढाके नामदेव** - मा. महापौर साहेब, सुचनेला अनुमोदन देतो.

**मा. उपमहापौर** – सर्वांनी श्रध्दांजलीसाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

,

[यानंतर सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.]

**मा. उपमहापौर** – मा. आयुक्त साहेबांना पाटबंधारे विभागाकडून कळवलेप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरासाठी मुबलक पाणीपुरवठा होत असून शहरातील पाणीपुरवठा ३० ते ४० टक्के गळती होते. पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी मा.आयुक्त साहेबांनी वैयक्तिक त्याच्यामध्ये लक्ष घालून कामामध्ये कसूर करणा-या अधिका-यांवर, कर्मचा-यांवरती कारवाई करावी. असे मी मा.आयुक्त साहेबांना आदेश देत आहे. सर्वांचे आभार मानून ही सभा गुरुवार दिनांक २०/१२/२०१८ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

-----

**(चिंचवडे सचिन बाजीराव)**

उपमहापौर

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -४११ ०१८.

,

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २४**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/११/२०१८ ची तहकूब सभा)**

**दिनांक – २०.१२.२०१८** **वेळ – दुपारी १.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/११/२०१८ (माहे नोंव्हेबर-२०१८) ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दिनांक २०/१२/२०१८ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ४) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ५) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ९) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| १०) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| ११) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |

,

१२) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१३) मा.ठंडे लक्ष्मण धोंडू

१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.गीता सुशिल मंचरकर

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

,

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.तुषार रघुनाथ हिंगे

४०) मा.अश्विनी भिमा बोबडे

४१) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४२) मा.संजय बबन नेवाळे

४३) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४४) मा.भालेकर प्रविण महादेव

४५) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४६) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४७) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४८) मा.घोलप कमल अनिल

४९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

५०) मा.पवळे सुमनताई मधुकर

५१) मा.चिखले सचिन तुकाराम

५२) मा.जावेद रमजान शेख

५३) मा.यादव मीनल विशाल

५४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५५) मा.प्रमोद कुटे

५६) मा.शैलजा अविनाश मोरे

५७) मा.बाबर शर्मिला राजू

५८) मा.अमित राजेंद्र गावडे

५९) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

६०) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६१) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

,

६२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६३) मा.ढाके नामदेव जनार्दन

६४) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६५) मा.करुणा शेखर चिंचवडे

६६) मा.भोईर सुरेश शिवाजी

६७) मा.अपर्णा निलेश डोके

६८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७०) मा.जयश्री वसंत गावडे

७१) मा.कोमल दिपक मेवानी

७२) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७३) मा.सुलक्षणा राजू धर

७४) मा.शाम गणपतराव लांडे

७५) मा.सुजाता सुनिल पालांडे

७६) मा.योगेश मंगलसेन बहल

७७) मा.कदम निकीता अर्जुन

७८) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७९) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८०) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८१) मा.नढे विनोद जयवंत

८२) मा.पाडाळे निता विलास

८३) मा.कोकणे संतोष अंकुश

८४) मा.पवार मनिषा प्रमोद

८५) मा.अभिषेक गोविंद बारणे

८६) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

,

८७) मा.निलेश हिरामण बारणे

८८) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८९) मा.दर्शले रेखा राजेश

९०) मा.कलाटे राहुल तानाजी

९१) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९२) मा.ममता विनायक गायकवाड

९३) मा.कामठे तुषार गजानन

९४) मा.चोंधे आरती सुरेश

९५) मा.कस्पटे संदिप अरुण

९६) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९७) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९८) मा.सुनिता हेमंत तापकीर

९९) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१००) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०१) मा.कुटे निर्मला संजय

१०२) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०३) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०४) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०५) मा.मुंढे उषा अंकुश

१०६) मा.लोखंडे चंदा राजू

१०७) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०८) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०९) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११०) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१११) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

,

११२) मा.नवनाथ दत्तू जगताप

११३) मा.संतोष बबन कांबळे

११४) मा.सोनवणे शारदा हिरेन

११५) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११७) मा. वाबळे संजय मल्हारराव

११८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११९) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२०) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२१) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर - आयुक्त, मा.पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे - प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे - मुख्यलेखा अधिकारी, मा.पाटील, मा.तुपे, मा.निकम, मा.सवणे - सहशहर अभियंता, मा.आष्टीकर, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे - सहा.आयुक्त, मा.लोणकर, मा.राऊत, मा.दांगट, मा.खोत - प्र.सहा.आयुक्त, मा.मुंढे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.शिंदे - प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग ), मा.लडकत, मा.गलबले, मा.ओंभासे, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.पवार - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.आगळे - प्रशासन अधिकारी, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी मा.माने-पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा. ढाके नामदेव** - मा. महापौर साहेब, अंधेरी येथे कामगार रुग्णालयात लागलेल्या भिषण आगीत ६ जणांचे निधन तसेच सी.के.जाफर शरीफ - काँग्रेसचे जेष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री अंबरीश -कन्नड अभिनेते तथा माजी केंद्रीय मंत्री, मोहम्मद अझिज - ख्यातनाम

,

प्रार्श्वगायक, प्रकाश जाधव-जम्मु काश्मिरमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत कोल्हापूरमधील जवान शहीद, केशवराव वाडेकर - भा.ज.पा. पुणे जिल्हयाचे जेष्ठ नेते व माजी जिल्हाध्यक्ष, संजय बंड - अमरावतीमधील शिवसेनेचे शिवसेना जिल्हाप्रमुख माजी आमदार, बबनराव कृष्णाजी चिंचवडे- चिंचवडगाव येथील जेष्ठ सामजिक कार्यकर्ते, डॉ. गिता अय्यंगार - योगागुरु, रखमाबाई तुकाराम कलाटे- कुणाल राजे – संततुकारामनगर, मुक्ताबाई कलाटे - राजेश वाघेरे - यांचे निधन झाले असल्याने त्यांना आजच्या सभेमध्ये श्रध्दांजली वाहण्यात यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा. ज्ञानदेव थोरात** - मा. महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

**मा. महापौर**- सर्वांनी श्रध्दांजली वाहणेसाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

[यानंतर सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.]

**मा. नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- १

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१०७६१/२०१८ दि.१४/०९/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३३३०, दि.१६/१०/२०१८

३) मा.आयुक्त यांचेकडील क्र.लेखा/०६/कावि/१३६६२/२०१८ दि.२९/११/२०१८ चे विषयपत्र मागे घेणेबाबतचे पत्र.

अतिरिक्त आयुक्त (२) यांनी त्यांचे कडील पत्र क्र.सुवि/५/कावि/४०४/२०१८ दि.३०/०८/२०१८ अन्वये सामाजिक सुरक्षितता उपक्रम या लेखाशिर्षावर र.रू.२ कोटी ५० लाख व पत्र क्र.सुवि/५/कावि/४०३/२०१८ दि.३०/०८/२०१८ अन्वये ठेकेदारी पध्दतीने सुरक्षा व्यवस्था या लेखाशिर्षावर र.रू.१३ कोटी तरतूद वाढवून मिळणेची विनंती केलेली आहे. त्यात ट्रॅफिक वार्डन मदतनीस यांचा किमान वेतन दर दि.०१/०४/२०१८ पासुन र.रू.११,८२४.७१ ऐवजी र.रू.२१,५१२/- झालेला आहे. रखवालदार मदतनीस यांचा किमान वेतन दर दि.०१/०४/२०१८ पासुन र.रु.११,५२६.१७ ऐवजी र.रू.२१,५१२/- झालेला आहे. त्याकरीता

,

ठेकेदारी पध्दतीने सुरक्षा व्यवस्था लेखाशिर्षावर र.रू.१३ कोटी व सामाजिक सुरक्षितता उपक्रम या लेखाशिर्षावर र.रू.२ कोटी ५० लाख तरतूद वाढवून मिळणेची विनंती केलेली आहे. अखर्चित निधीतून ठेकेदारी पध्दतीने सुरक्षा व्यवस्था या लेखाशिर्षाकरिता र.रू.५ कोटी व सामाजिक सुरक्षितता उपक्रम या लेखाशिर्षाकरिता र.रू.१.५० कोटी अखर्चित निधीतून वाढ करून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. हर्षल ढोरे -** मा. महापौर साहेब, वरील ठरावास अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** विषय क्रमांक १ प्रशासनाने मागे घेण्याची विनंती केलेली आहे त्यानुसार विषय क्रमांक १ मागे घेण्यास परवानगी देणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक- ३२३ विषय क्रमांक- १
दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१०७६१/२०१८ दि.१४/०९/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३३३०, दि.१६/१०/२०१८
३) मा.आयुक्त यांचेकडील क्र.लेखा/०६/कावि/१३६६२/२०१८ दि.२९/११/२०१८ चे पत्र.

मा.आयुक्त यांचेकडील संदर्भ क्र. ३ चे पत्र क्र.लेखा/०६/कावि/१३६६२/२०१८ दि.२९/११/२०१८ चे पत्रातील मा.आयुक्त यांचे मागणीनुसार विषय क्रमाक १ वरील विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत येत आहे.

अनूकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा. माधुरी कुलकर्णी** - मा. महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

,

ठराव क्रमांक- ३२४ विषय क्रमांक २

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/५/कावि/६१२/२०१८ दि.१७/१०/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३४६१, दि.३०/१०/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना राबवून निवड झालेल्या सोसायटींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने सामान्य करामध्ये सूट देणेबाबत मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ९९३, दिनांक १९/९/२०१७ व मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ८४, दि.१६/१०/२०१७ रोजीचे मंजूर ठरावा नुसार १२ ते १०० व १०० चे पुढील फ्लॅट/बंगलो/रो हाऊस असलेली सोसायटी या २ गटा मध्ये प्रती क्षेत्रिय कार्यालया मधून १ या प्रमाणे ८ क्षेत्रिय कार्यालयात “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजना सन २०१७-२०१८ ते २०१९-२०२० या कालावधीत ३ वर्षे करिता राबविण्यात येत आहे. आदेश क्रमांक कर/मुख्य/०५/कावि/३६६/२०१७, दिनांक १८/१२/२०१७ अन्वये “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजना राबवून प्राप्त गुणांकानुसार सामान्य करात सूट देणे तसेच क्षेत्रिय कार्यालय निहाय सोसायटींची तपासणी करणेकामी दोन मनपा अधिकारी, एक अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी व एक पत्रकार यांचा समावेश असणारे तपासणी पथकाची नेमणूक करणेत येऊन उक्त आदेशान्वये ८ क्षेत्रिय कार्यालयांमध्ये सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजना राबविण्यात आली.त्यानुसार आदेश क्रमांक कर/मुख्य/०५/कावि/१०६/२०१८, दि.१३/०४/२०१८ अन्वये क्षेत्रिय कार्यालयामार्फत गट क्रमांक २ मध्ये एकापेक्षा जास्त सोसायटी गृहप्रकल्पांची शिफारस करण्यात आली आहे. “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजनाचे धोरणानुसार क्षेत्रिय कार्यालय निहाय गट क्रमांक २ मध्ये प्रत्येकी १ याप्रमाणे सर्वाधिक गुणांक प्राप्त झालेल्या सोसायटी गृहपक्रल्पांची सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे सामान्य करात सवलत देणेकामी आदेश निर्गत केलेले आहेत. सदर योजना अंमलबजावणीचे प्रथम वर्ष असल्याने शहरातील सोसायटी गृहप्रकल्प यांचे मध्ये अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.तसेच अ व ब क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत निवड झालेल्या सोसायटींना अनुक्रमे प्रथम क्रमांकाचे ६८ व ७२ गुण प्राप्त झाले असून त्यांना सामान्य करातील सवलत

,

देण्यात आलेली आहे. परंतु अन्य सोसायटी सूद्धा शहर पर्यावरण पूरक होण्यास महापालिकेचे कामकाजात हातभार लावत आहेत. “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजनेचा उद्देश हा शहर पर्यावरण पूरक व स्वच्छ होणे पर्यायाने कचरा वाहतूक व विल्हेवाट करण्याची महापालिकेवर व इतर शासकीय यंत्रणावर पडणारा अतिरिक्त ताण काही प्रमाणात कमी करणेचा असल्याने स्पर्धेत सहभाग घेऊन ज्या सोसायटी गृहप्रकल्पांना किमान ६६ पेक्षा अधिक गुण प्राप्त झालेले आहेत. अथवा या पुढे होतील.अशा शहरातील सर्व सोसायटी गृहप्रकल्पांना चालू मागणीतील सामान्य करात निश्चित केलेल्या गुणाकांनुसार सवलत सामान्य करातील इंतर सवलती व्यतिरिक्त सोसायटीस प्राप्त झालेले गुण विचारात घेता सदर सोसायटीतील मिळकतधारकांना “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजनेअंतर्गत सन २०१८-२०१९ पासून सामान्य करात बक्षीस योजना राबविणेकामी खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

गट १–१२ ते १०० फ्लॅट/बंगलो/रो हाऊस असलेली सोसायटी. २) १०० चे पुढील फ्लॅट /बंगलो/रो हाऊस असलेली सोसायटी. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना अंमलबजावणीचे मुख्य निकष व गुण खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मुख्य निकष | गुणांक |
|---|---|---|
| १ | इमारत व इमारतीचे परिसरामध्ये 100% कचरा वर्गीकरण व प्रक्रिया | ३० |
| २ | पाणीसंवर्धन, पाणीपुनर्चक्रण, पाणीपुनर्वापर | २० |
| ३ | सौर उर्जा प्रकल्प, एल.ई.डी. दिव्यांचावापर | १५ |
| ४ | वृक्षारोपण आणि संवर्धन, लॅण्ड स्केपिंग | २० |
| ५ | पर्यावरण पूरक नाविन्यपूर्ण उपक्रम | १५ |
| | एकूण | १०० |

शहर स्तरावर सर्वोत्कृष्ट पर्यावरण पूरक उपक्रम राबविणा-या व ५ स्टार असलेल्या ३ सोसायट्यांना आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी तपासणी मध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या व स्पर्धाच्या आधारे शहर स्तरावर व रेटिंगनुसार सामान्य करात देण्याचे सवलतीची टक्केवारी

,

शहर स्तरावरावरील सोसायट्या

| अ.क्र. | गुण तपशील | रेटिंग | गुणांनूक्रम | सामान्य करात सवलत |
|---|---|---|---|---|
| १ | ८६ ते १०० गुण | ***** | ०१ | २५% |
| | | | ०२ | २०% |
| | | | ०३ | १५% |

**शहर स्तरावरील वगळून अन्य सोसायट्या**

| अ.क्र | गुण तपशील | रेटिंग | सामान्य करात सवलत |
|---|---|---|---|
| १ | ८६ ते १०० गुण | ***** | १०% |
| २ | ७६ ते ८५ गुण | **** | ०७% |
| ३ | ६६ ते ७५ गुण | *** | ०५% |

१) महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटीची निवड करणे.

२) आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी स्पर्धेतील विजेत्या सोसायट्यां मधील मिळकतींना मनपा मार्फत सध्या सामान्य करातील देण्यात येणा-या सवलतीं व्यतिरिक्त स्टार रेटींग नुसार सामान्य करात सवलत देणे.

३) तपासणी केलेल्या आर्थिक वर्षाचे पुढील आर्थिक वर्षात दिनांक ३० जून अखेर थकबाकीसह संपूर्ण बिलाची एक रक्कमी रक्कम भरणा करणा-या मिळकती सवलतीच्या लाभास पात्र राहतील.

४) आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना सन २०१८-२०१९ ते २०१९-२०२० या कालावधीत २ वर्षे राबविण्यात येईल.

,

५) शहर पातळीवरील स्पर्धेत निवड होणा-या सोसायटीसाठी फक्त २ वर्षे (दोनच वेळेस) पारितोषीक दिले जाईल.

तरी “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजना राबवून निवड झालेल्या सोसायटीं मधील मिळकतींना महापालिकेमार्फत सध्या सामान्य करातील देण्यात येणा-या सवलतीं व्यतिरिक्त स्टार रेटींगनुसार सामान्य करात सवलत देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. सुजाता पालांडे -** मा. महापौर साहेब, वरील ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उषा ऊर्फ माई ढोरे** - मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३२५ विषय क्रमांक- ३
दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.लेखा/२३/कावि/१२६९७/२०१८, दिनांक – ३०/१०/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३५९२, दि.०५/११/२०१८

सन २०१८-२०१९ च्या मुळ अंदाजपत्रकात भाग-३ मध्ये मुख्यमंत्री सहायत्ता निधी या लेखाशिर्षावर र.रु.१,००,००,०००/- तरतूद करण्यात आलेली आहे. या आर्थिक वर्षात केरळ पुरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधी या लेखाशिर्षावर भाग-३ मध्ये मनपा अधिकारी/ कर्मचा-यांचे वेतनातून १ दिवसाचा पगार कपात करणेत आलेला आहे. व ती र.रु.१,०४,०१,०१२/- इतकी आहे. आजतागायत मुख्यमंत्री सहायत्ता निधी र.रु.९५,०४,२४६/- अदा करणेत आलेले आहेत. र.रु.८,९६,७६६/- अदा करणे बाकी सदर रक्कम अदा करणेस

,

तरतूद अपूर्ण आहे. व सदर रक्कम अदायगीकामी भाग–३ अंदाजपत्रकात जमा/खर्चात वाढ करणे आवश्यक आहे. लेखा विभागा मार्फत सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात मुख्यमंत्री सहायत्ता निधीस तरतूदी करण्यात आलेली होती. परंतु केरळ पुरग्रस्त नैसर्गिक आपत्तीमुळे जमा होणा-या रक्कमेपेक्षा सदर तरतूद र.रु.५,००,०००/- कमी पडत आहे. तरी सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात भाग-३ मध्ये जमा व खर्चास र.रु.५,००,०००/- वाढ करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतुद क्र.२(१) नुसार वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. सिमा चौगुले -** मा. महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा. नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो....

**मा.मंगला कदम -** मा. महापौर साहेब, मा. मुख्यमंत्री निधीचा विषय आहे याला स्थापत्याची उपसूचना देता येणार नाही. स्थापत्याच्या विषयाला उपसूचना दयावी.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.माधुरी कुलकर्णी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३२६ विषय क्रमांक- ४

दिनांक -२०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/९१५/२०१८, दि.०१/१०/२०१८

२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.५७ दि.२/११/२०१८

महापालिका आस्थापनेवर “सह शहर अभियंता (स्था)” या अभिनामाची एकूण ०३ पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० मध्ये शासन मंजूर आहेत. प्रस्तुतच्या पदाकरीता शासन निर्णयाप्रमाणे निर्धारित केलेली अर्हता

अ) शासन निर्णय क्र.पीसीसी-३०९१/८६९/प्र.क्र.१४४/९१/नवि-२२, दि.१८/०४/९४ आणि क्र.पीसीसी-३०९४/११०९/प्र.क्र.२८८/९४/नवि-२२, दि.२५/०८/१९९८ नुसार पदोन्नती -

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी (बी.ई.सिव्हील)

,

२. उपअभियंता या पदावरील १० वर्षे सलग सेवा अनुभव आवश्यक किंवा

३. कार्यकारी अभियंता या पदावरील कामकाजाचा सलग ५ वर्षे अनुभव.

ब) शासन निर्णय क्र.पीसीसी-३०१०/२२५/प्र.क्र.६६/नवि-२२, दि.७ जून २०१० नुसार पदोन्नती –

१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका (बी.ई.सिव्हील/डी.सी.ई.)

२. कार्यकारी अभियंता या पदावरील कामकाजाचा पदवीधारक असल्यास ७ वर्षे व पदविकाधारक असल्यास किमान १० वर्षाचा अनुभव.

सद्यस्थितीमध्ये या संवर्गामध्ये एक पद रिक्त असून श्री.पठाण आयुबखान अहमदखान, सहशहर अभियंता यांच्या दि.३०/०९/२०१८ रोजीच्या नियत वयोमान सेवानिवृत्तीमुळे आणखी एक पद रिक्त होत आहे. प्रस्तुतची पदे पदोन्नतीने भरणेबाबत दि.०४/०९/२०१८ व दि.१९/०९/२०१८ रोजी पदोन्नती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व कार्यकारी अभियंता (स्था) तसेच उपशहर अभियंता पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, गोपनीय अहवाल, सेवा जेष्ठता आणि मत्ता व दायित्व इ. सेवा विषयक तपशील पडताळून श्री.निकम मकरंद ज्ञानोबा यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० मध्ये सह शहर अभियंता (स्था) पदावर स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाजेष्ठता व पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या याचिका क्र.४२०६/२००८, क्र.४२०७/२००८, क्र.१५३१/२००९, क्र.१२२४८/२००९, क्र.२२५९/२०१५, क्र.४२३०/२०१८ आणि मे.आकुर्डी न्यायालय येथे न्यायप्रविष्ठ असलेली याचिका क्र.३२/२००८ व मे.औद्योगिक न्यायालय, पुणे येथे दाखल कंप्लेट युएलपी क्र.१७/२०१४ तसेच पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठते नुसार पदोन्न्तीच्या कोठयातील खुल्या प्रवर्गाच्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.विधी/मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देणेबाबत सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, श्री.निकम मकरंद ज्ञानोबा यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ७६०० मध्ये सह शहर अभियंता (स्था) पदावर स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाजेष्ठता व पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या याचिका क्र.४२०६/२००८ क्र.४२०७/२००८,

,

क्र.१५३१/२००९, क्र.१२२४८/२००९, क्र.२२५९/२०१५, क्र.४२३०/ २०१८ आणि मे.आकुर्डी न्यायालय येथे न्यायप्रविष्ठ असलेली याचिका क्र.३२/२००८ व मे.औद्योगिक न्यायालय, पुणे येथे दाखल कंप्लेट युएलपी क्र.१७/२०१४ तसेच पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठते नुसार पदोन्न्तीच्या कोठयातील खुल्या प्रवर्गाच्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.उषा ऊर्फ माई ढोरे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ५

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/मुका/तां.वि/३४७/२०१८, दि.१६/०७/२०१८
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१५, दि.२८/०८/२०१८
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २८५ दि.२७/०९/२०१८
४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- ३१३ दि.३१/१०/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सन २०१२-१३ पासून ऊर्जा संवर्धनाच्या दृष्टीकोनातून जुने सोडियम व्हेपर/मेटल हालाईड दिवे/टि-५(९६ वॅट) काढून एलईडी दिवे बसविणेची कामे सुरू आहेत. महापालिकेच्या उर्जा संवर्धनाच्या दृष्टीने सोडियम व्हेपर/ /टि-५/सीएफएल/मेटल हालईड दिव्याच्या ऐवजी रस्त्याच्या प्रकारानुसार आवश्यक प्रकाश प्रमाण

,

राखणेकरीता (लक्स लेव्हल) उर्वरीत एलईडी व्यतिरिक्त दिव्यांच्या ठिकाणी योग्य क्षमतेचे एलईडी दिवे बसविणेकामी सर्वे करणे, डीपीआर बसविणे व पर्यवेक्षण करणेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.ऊर्जा नियोजन प्रा.लि.पुणे यांची नेमणूक करणेत आली आहे. मे.ऊर्जा नियोजन प्रा. लि. पुणे यांनी सर्वेचे कामकाज पुर्ण केलेले असून प्राप्त सर्वेनुसार अहवाला नुसार सुमारे ३८७५५ इतके विविध क्षमतेचे एलईडी दिवे विविध रस्त्यावर बसविणेत आलेले असून अद्यापपर्यंत सुमारे ३६१३४ दिवे सोडियम व्हेपर/ /टि-५/सीएफएल/मेटल हालाईड (MH) या प्रकारचे आहेत. सदरचे काम स्वखर्चातून किंवा ईस्क्रो माध्यमातून करावयाचे नियोजन मनपाचे होते. तथापि ईस्क्रो तत्वावर एलईडी दिवे बसविणेसाठी राज्य शासनाने ईईएसएल सोबत करारनामा केलेला आहे. त्यानुसार राज्य शासनाने त्यांचेकडील दि.१२ जानेवारी २०१८ चे शासन निर्णयानुसार सर्व नागरी संस्थानी पथ दिव्यांसाठी फक्त एलईडी दिवे बसविणे व त्यासाठी ईईएसएल सोबत करारनामा करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार मे.ईईएसएल कडून विहित केलेल्या तक्त्यामध्ये माहिती मागविणेत आली होती. मनपाने सादर केलेल्या माहितीनुसार मे.ईईएसएल कडून प्रकल्प प्रस्ताव (Project Proposal) व करारनामा मसुदा (Draft Agreement) पाठविला आहे. त्याबाबत सविस्तर माहिती खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे. सद्यस्थितीत मनपा हद्दीत एकूण दिव्यांची संख्या सुमारे - ७४८८९ इतकी आहे. एकूण विद्युत भार - १०.०६ MW एलईडी बसविण्यात आलेल्या दिवाबत्तीची संख्या - ३८७५५, एलईडी बसविण्यात आलेल्या एलईडी विद्युत भार -३.२७ MW, ईईएसएल कडून एलईडी बसवावयाच्या दिव्यांची संख्या - ३६१३४ एवढी आहे. वार्षिक दिवाबत्तीचे वीजबील अंदाजे र.रू.२७.३९ कोटी (सर्व दिवे चालू स्थितीत गृहीत धरून) ईईएसएल मार्फत ईस्क्रो तत्वावर (cost sharing based) जुने पारंपारिक फिटींग काढून एलईडी फिटींग बसविणेत येणार आहे. फिटींग्सची वॉरंटी ७ वर्षे (इन्शूरन्सह) आहे. मध्यवर्ती नियंत्रीत कक्षातून दिवे नियंत्रीत करणारी यंत्रणा (CCMS) चादेखील अंतर्भाव आहे. बसविलेल्या एलईडी दिव्यांची देखभाल व दुरूस्ती काम ईईएसएल मार्फतच करण्यात येणार आहे. होणा-या उर्जा बचतीकरीता राष्ट्रिय बँकेत उर्जा बचत स्वंतत्र खाते उघडावे लागेल. होणा-या उर्जा बचत व देखभाल व दुरूस्ती कामावर लागणारा खर्च बचतीतून एन्यूटी बेसीसवर ईईएसएल यांना अदा करावा लागेल.

ईईएसएल ने सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावानुसार खालील बाबी दिसून येतात –

,

1. सदरचा प्रकल्प ईस्क्रो तत्वावर राबविणेत येणार असून सुरवातीस महापालिकेस कोणताही खर्च करावा लागणार नाही.
2. सध्यस्थितीतील दिव्यांचा तसेच एलईडी बसविणेत आलेनंतर दिव्यांच्या प्रकाश तीव्रतेचा संयुक्तीक पाहणी करून अहवाल तयार करणेत येणार आहे.
3. नॅशनल लाईटींग कोड नुसार रस्त्यावर आहे तशीच किंवा त्यापेक्षा जास्त सुधारित लक्स लेवल ठेऊन दिव्यांचे वॅटेज निश्चित केले जाणार आहे.
4. एलईडी फिटींगची वॉरंटी कालावधी देखभाल व दुरूस्तीसह सात वर्षाचा असून प्रत्यक्ष होणा-या वीजबचतीतून अँन्यूटी बेसीसवर ईईएसलला प्रतिवर्षी निर्धारित केलेली रक्कम वर्षांकरिता अदा करावी लागणार आहे.
5. सदर कामामध्ये एलईडी फिटींग बसविणेत येत असलेल्या ठिकाणी ब्रॅकेट, क्लॅम्प साहित्य व वायर कामाचा समावेश आहे.
6. सदर कामामध्ये एलईडीसह व सीसीएमएस यंत्रणा बसविणे कामाचा समावेश आहे.
7. मनपाने उर्जा बचतीतून प्राप्त झालेली रक्कम भरणेकरीता राष्ट्रिय बँकेत स्वतंत्र रित्या एस्क्रो खाते (escrow) उघडून सुरवातीला अँन्यूटीच्या (प्रतिवर्षी निर्धारित केलेल्या रक्कमेच्या) तीन महिन्यांची रक्कम सदर खात्यात मनपाला जमा करावी लागणार आहे.
8. एलईडी दिवे बसविलेनंतर दिव्यांची संपूर्ण देखभाल दुरूस्ती ईईएसएल मार्फत करण्यात येणार आहे मात्र पायाभूत सुविधेकरीता जादा होणारा खर्च मनपास करावा लागणार आहे.

तरी मे.ईईएसएल यांचेकडून पारंपारिक दिवे बदलून एलईडी दिवे बसविणे व तदनंतर होणा-या वीजबचतीतून अँन्यूटी बेसीसवर निर्धारित रक्कम पुढील 7 वर्षांकरिता प्रतिवर्षी मे.ईईएसएलला ईस्क्रो खाते काढून अदा करणेसाठी करारनामा करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.चंदा लोखंडे** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

,

**मा. निलेश बारणे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. साधारणपणे शहर सुधारणामध्ये हा विषय आला होता. हया विषयामध्ये आम्ही खुलासा मागितला होता. आम्ही या गोष्टीला विरोध देखील केला होता. महापौर साहेब, आपल्याकडे साधारणपणे ३६ हजार एलईडी आपण पहिल्या लावलेल्या आहेत. आपण स्वत: हे करु शकत नाही का. कारण की त्यांनी एका एलईडीची २५ हजार प्राईस लावलेली आहे, १०० वॅटची. आणि आपण ती एलईडी ४६०० रु. ला परचेस करत आहोत. याच्यामध्ये भरपूर तफावत आहे या गोष्टीमध्ये. महापौर साहेब, लाईटमध्ये जी बचत होते त्या बचती मार्फत आपण त्यांना १० कोटी ७५ लाख रुपये रिटर्न देणार आहोत. आपण जर साधं कॅलक्यूलेशन केल ना महापौर साहेब, आपण हया ३६ हजार एलईडी स्वत: लावल्या तर आपल्याला १५ कोटी रुपये खर्च होतो आणि आपण त्यांना वर्षाला १० कोटी ७५ लाख रिटर्न देतोय. म्हणजे त्यांचे मुद्दल आपण त्यांना दिड वर्षामध्येच रिटर्न करताये. आपण त्यांच्याशी सात वर्षासाठी ॲग्रीमेंट करतोय. आपल्या पिंपरी चिंचवड मध्ये ब-याच एलईडी कंपन्या आहेत आपण त्यांना काम देऊ शकत नाही का. केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने लागू केलेल्या कंपन्याना आपण काम दयायचे, हि कुठेतरी तफावत आहे आणि हे चूकीचे आहे हया गोष्टीला आमचा विरोध आहे. आमचा विरोध नोंदविण्यात यावा, धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह एलईडीचा विषय घेतला आहे. या विषयामध्ये नमुद केले आहे की शासनाकडून आपल्याला हे बंधनकारक करणेत आलेलं आहे. परंतु त्यांचा सायनींग अथॉरिटी आहे, एमओयू जर पाहिलातर याच्यामध्ये सन्मा. आयुक्त साहेब उल्लेख असा आहे की ज्या शहराची, ज्या महानगरपालिकेची आर्थिक कुवत नसेल अशा शहरांना हे बंधनकारक आहे. मग ख-या अर्थाने महापालिका सभेपुढे विषय आणत असताना असा विषय यायलाच नको होता. आपण त्यांच्याकडून खरेदी करायची का आपण आपल्या लेव्हलवर खरेदी करायची. अशी परमिशन, अशी परवानगी सन्मा. आयुक्तसाहेब आमच्याकडून किंवा सभागृहाकडून घ्यायला हवी होती. आणि त्यानंतर हा विषय विषयपत्रिकेवर येणे अपेक्षित होते. तुम्ही स्वतः एमओयू वाचा त्याच्यामध्ये असं लिहीलेलं आहे की ज्या महानगरपालिका किंवा ज्या संस्था आहेत अशा सर्व संस्थांनी, ज्यांची आर्थिक कुवत नाही अशाच लोकांना ते त्यांच्याकडून घेणे बंधनकारक आहे. जर आपली आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असे आपण म्हणतो तर

,

आपला हा अट्टाहास कशासाठी. किंबहुना तुम्ही आणि तुमचे अधिकारी अत्यंत चुकीच्या पध्दतीने विषय आणतात. महापौर साहेब आपल्याला विनंती आहे याठिकाणी आपण हे विषयपत्र कसं आणले आहे. त्याचा खुलासा त्यांनी दयावा. एमओयू त्यांच्याकडे आहे त्यातील मुद्दा क्रमांक ३ चा खुलासा करावा. अशा प्रकारच्या एलईडी घेणे बंधनकारक नाही. आणि सन्मा. आयुक्तसाहेब आपण ज्या काही शहरामध्ये एलईडी लावतो. आज आम्ही १३३ नगरसेवक याठिकाणी आहोत. आमच्या शहरातील आमच्या रस्त्यातील आमच्या गल्लीतील एखादी एलईडी बंद पडली तर पहिला जे.ई.ला फोन करायचा नंतर डेप्यूटीला फोन करायचा. नंतर एक्झीक्यूटीव्ह पर्यंत बोलता बोलता त्यातली एक एलईडी गेलीतर आम्हाला आठ दिवस किमान चार दिवस तरी आमच्या इथं एलईडी लागायला आम्हाला वेळ लागतो. आज तुम्ही सांगताय की आज आपण एलईडी शासनाकडून किंवा ईईएसएल नावाच्या कंपनीकडून आपण यांच्याकडून घ्यायच म्हणतोय. आयुक्त साहेब तुम्हाला माहीत नसेल तुम्ही नागपूरला ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या एलईडी घेतल्या आहेत त्याची चौकशी करा. सन्मा. सभागृहाला विनंती आहे की या विषयामध्ये लक्ष घालणे अत्यंत आवश्यक आहे. त्याठिकाणी महापौर साहेब आपल्याला समोरच्या माणसाकड म्हणजे जस टोल फ्री नंबर येतो. त्या पॅकेटवर टोल फ्री नंबर येतो. त्या नंबरवरती आपण कॉल करायचा आमच्या नगरसेवकांनी. की या या ठिकाणची एलईडी बंद आहे मग तिकडून रिसपॉन्स येईल. त्या त्या वेळेला आमच्या एलईडी दुरुस्त होतील, किंवा रिपेअर केल्या जातील. म्हणजे आज आम्हांला आमची स्वत:ची महानगरपालिका आहे. महानगरपालिकेच्या अधिकारी लोकांशी आमचा रोजचा संपर्क असतो. अशा अधिका-यांकडून काम करीत असताना जर आम्हाला चार दिवसांचा कालावधी लागत असेलतर ज्यावेळेला बाहेरुन एलईडी घेतल्यानंतर वीस हजार एलईडींचे कॉन्ट्रॅक्ट असणार आहे असं ऐकायला मिळतंय. अशा लोकांकडून आपण ही प्रक्रिया केली तर सन्मा. आयुक्तसाहेब, आम्हांला ज्या पध्दतीने आता आमच्या शहरवासियांना की ज्यांच्यामुळे आम्ही या सभागृहात आहोत अशा शहरवासियांना आम्ही तितक्याच तत्परतेने, तीतक्याच चांगल्या प्रकारे एलईडीची सुविधा देऊ शकतो का. आणि आयुक्त साहेब महापौर साहेब आपल्याला विनंती आहे मगाशी जो मुद्दा सांगितला. खरेदी करणे बंधनकारक नाही. चुकीचा विषयपत्र आपण सभागृहासमोर आणल जातय. त्याच्यामुळे साहेब मला खुलासा पाहिजे त्याच्यानंतर मला परत बोलायचं आहे. महापौर साहेब विनंती करते की त्याच्यामध्ये कुठेच उल्लेख नाही. की महानगरपालिकेने ईईएसएल कंपनीकडूनच एलईडी घेतल्या पाहिजेत असा कुठेही उल्लेख

,

नाही. मग प्रशासन आपल्यावरती का लादत असा हा सगळा प्रकार. प्रत्येक वेळेला सांगितले जाते की शासनाने सांगितलयं, शासनाने सांगितलयं, शासनाने असं काहीच सांगितल नाहीये. महापौर साहेब खुलासा घ्या नंतर मला बोलायचं आहे.

**मा.वैशाली घोडेकर** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह मला याठिकाणी सांगायचे आहे की आयुक्तांनी या विषयाबद्दल एक मिटींग लावली होती. सर्व सभासद त्याठिकाणी होते. त्याठिकाणी आयुक्तसाहेबांनी ८० चे ब्रेकअप त्यांच्याकडून मागितलं होतं. ते त्यांनी दिलं का. हा एक माझा प्रश्न आहे आणि तो लिहून घ्या. तुपेसाहेब आयुक्तांनी त्या मिटींगमध्ये जो प्रश्न विचारला होता. त्याची उत्तरे आमच्या सन्मा. सदस्यांना दिली का याचा खुलासा करावा. ८० चे ब्रेकअप मागितलं होतं ते ही दिलं नाही. याठिकाणी महापौर साहेब मी एक सांगू इच्छिते की शहरामध्ये एलईडी बसविणे हे फक्त २५ ते ३० टक्के काम राहिलेले आहे. त्याच्यासाठी जास्तीत जास्त १२ ते १५ कोटी खर्च येईल. मग आपण शासनाला जवळजवळ ७७ कोटी का देत आहोत. जर आपले काम  १२ ते १५ कोटी मध्ये होणार आहे. तर आपण त्याठिकाणी ७७ कोटी का देत आहोत. शहर सुधारणामध्ये सुध्दा आम्ही विरोध केला होता. आमचा विरोध फक्त एकाच गोष्टीला होता. आमचा विरोध या विषयाला नाही. जे तुम्ही ८० रुपयाने आणलेले आहे त्याला आमचा विरोध आहे. तुम्ही ते रेट रिवाईज करुन आपल्याकडे ती एलईडी ४५ ते ५० रुपयाला पडते. ते रेट तुम्ही रिवाईज करुन आणा आणि हा विषय मंजुर करुन घ्या काहीच हरकत नाही. आपण विश्वस्त आहोत. आपण केंद्राचे नाही स्टेटचे विश्वस्त नाहीत. आपण पिंपरी चिंचवडया नागरीकांचे याठिकाणी विश्वस्त आहोत. याचे याठिकाणी भान ठेवावे. त्यामुळेच सांगते आपण १५ कोटीवरुन त्याच कामाला ७७ कोटी रुपये जास्त दयायचे का. ५० कोटी रुपये आपण याठिकाणी महापालिकेचे नुकसान करतोय. एवढच मला या सभागृहासमोर आणायचय. माझ्या या तीन प्रश्नांची उत्तरे दिल्याशिवाय महापौर साहेब आपण कोणताही निर्णय घेऊ नये. आणि घ्यायचा असेल तर हा विषय मतदानाने झाला पाहिजे.

**मा. संदीप वाघेरे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह हा एलईडीचा विषय प्रशासनाने आणला आहे. ईईएसएल कंपनीचा. आयुक्त साहेब मला सांगा की तीन वेळा याच्यावर चर्चा झाली आहे. याबाबत प्रेझेंटेशन झाले. ईईएसएल कंपनी केंद्र सरकारने आणली आहे. त्यांनी सांगितले की आमच्या मार्फत एलईडी घ्यायच्या. म्हणजे केंद्र सरकार

,

आपल्यावरती बंधन टाकत आहे. पण ईइएसएल कंपनी आपल्याला ८० रुपयांनी, १०० रुपयांनी लाईट देत असेल. म्हणजे जर १०० ची एलईडी जर घेतली म्हणजे ती ९६ चीच असते. आज आपण जर ओपन मार्केटमधुन एलईडी घेतलीतर आपल्याला ती ८० ते ८५ रुपयाला पडते आणि आता ही ७३ कोटी ५० लाख रु. दरवर्षाला १० कोट रु दयायचे आहेत असे आपण यांना सात वर्षे पैसे दयायचे. आयुक्त साहेब मला काय म्हणायचं की मागच्या वेळेला तुपे साहेबांनी ज्या फिटींग घेतल्या, पहिल्या कास्टींगच्या फिटींग होत्या त्या काढल्या आणि पऱ्याच्या फिटींग घेतल्या. साडेसहा हजार रुपयाला एक फिटींग आपल्याला पडली. आणि प्रत्येक प्रभागामध्ये बसविल्या. फक्त ब प्रभागने तिथे दुरगुडे होते त्यांनी तीथे विरोध केला त्या फिटींग घेतल्या नाहीत. चार नळयाची फिटींग होती एक नळी २५ ची अशा चार १०० च्या होत्या. त्यातल्या एक वर्षाच्या आतमध्ये तीन नळया बंद पडल्या आणि एक नळीवर एलईडी चालू. त्याचं असं झाले साहेब की तुपे साहेबांचे म्हणणे होते की आम्ही लाईट बचत केली. म्हणजे तीन नळया बंद पडल्या म्हणजे ७५ वॅट सेव्हींग झाली हे त्याच श्रेय आहे. म्हणजे लोकांना काय भेटत काय नाही ते त्यांना माहीत नाही. ती फिटींग्ज दरवर्षाला ७०० रुपये मेंटेनन्स प्रमाणे साडेतीन हजार रुपये आपण पाच वर्षासाठी ठेकेदाराला दिले म्हणजे साडेसहा हजार प्लस साडेतीन हजार रुपयाला म्हणजे दहा हजाराला आपल्याला ती फिटींग्ज पडली. आणि पाच वर्षानंतर असा कोणता साक्षात्कार झाला की शंभर टक्के त्या सगळया एलईडी खराब झाल्या आणि आपण परत भंगारात काढल्या. आणि नंतर परत एलईडी आपण घेतोय. आता मी सिस्का कंपनीच परस्पर कोटेशन मागवून घेतले. साधी एलईडी आपल्याला १६ कोटी ४४ लाखाला पडते. ३६,१३४ एलईडी. ही ईइएसएल कंपनी काय करणार चार कंपन्या बोलाविणार. फिलीप्स असेल, क्रॉम्प्टन असेल. बाकीच्या कंपन्या असतील या बोलवणार आणि हया कंपन्या त्यांच्या त्यांच्यामध्ये टेंडर पध्दतीने की तुम्ही आम्हांला किती स्वस्त देता हे विचारणार. म्हणजे आज पर्यंत महापालिका हा उदयोग करत होती ती आता ईइएसएल कंपनी महापालिकेच्या वतीने उदयोग करणार. आणि त्याच्यामध्ये आपल्या दरवर्षी साडेदहा कोटी असे ७३ कोटी ५० लाख. असं हे वाढत वाढत कुठेपर्यंत वाढेल. हे पार १०० कोटीपर्यंत जाईल. मला असं म्हणायच आहे की आता आपली लाईट एक ते दिड टप्प्यात बंद असते पिंपरी चिंचवडमध्ये. चार नळयांपैकी एक नळी चालू असते. असे तुपे साहेबांचे म्हणणे आहे. तुपे साहेब म्हणजे पिंपरी चिंचवड महापालिकेला लाभलेली अदभूत देणगी आहे. त्यांचे पाच वेळा प्रमोशन झालेले आहे. सिनॅरीटी डावलून झाली का कसं झालंय

'

काय झालंय याची चौकशी करा. आणि यांनी तीनच्या फिटींग घेतल्या त्यासाठी आपण त्यावेळेला किती खर्च केलाय ते पण बघा. आणि आता हे ईइएसएल कंपनीने आणलय. पुणे कार्पोरेशनने तीकडच्या वर्धा भागातल्या महापालिकेने नगरपालीकेनी हे टेंडर फेटाळून लावले आहे. साधारणपणे आपला ३० कोटी रुपये आपला एलईडीचा खर्च होत असेलतर टोटल ३६ हजार एलईडी घेण्यासाठी. याच्यामध्ये आपल्या महापालिकेची बचत अशी होईल की ५० कोटी तर वाचतीलच वाचतील. आणि तो ठेकेदार पाच वर्षे. कुठलीही पाच वर्षाची गॅरंटी देते. आज आपण टीव्ही फ्रीज जरी घरात घेतला तर त्याची वारंटी गॅरंटी वर्ष दोन वर्षाची भेटते. आज महापौर साहेब तुमच्या घरामध्ये टीव्ही असेल जुना घेतला असेल किंवा नवीन घेतला असेल पण तो दहा-वीस वर्षे पंचवीस वर्षे चाललाय की नाही. तो लगेच बंद झाला, खराब झाला म्हणून फेकून दिलाय आपण. म्हणजे आता आपण ३६ हजार एलईडी घेणार. आता मागच्या वेळेला एलईडी घेतल्या त्याची चौकशी करा किती घेतल्या होत्या. त्याच काय झालं त्या आज आपण भंगारात काढल्या आहेत काय सगळया. मला एकच म्हणायचं आहे आयुक्त साहेब आता ईइएसएल कंपनीला आपण सगळ ओव्हरऑल देतो, त्यादिवशी त्यांचे प्रेझेंटेशन पण त्यांना करता आल नव्हतं. तुमच्या समोरच सगळ झाल. आता ईइएसएल कंपनीला साधारणपणे तीन टक्के सल्लागार फि, मेंटेनन्स चार्जेस चार टक्के, म्हणजे सतरा टक्केतर आपण असेच देतोय. म्हणजे ही महापालिका आपण दिवाळखोरीमध्ये काढणार आहात का. आर्थिक सुबत्ता या महापालिकेला आहे. इंडस्ट्रीयल एरिया आहे, बाकीच्या गोष्टी आहेत. मग आपले पैसे आपण कुठेही, कसेही खर्च करायचे का, आज आपले पैसे वाचले पाहिजेत. जेणेकरुन आपल्याला याच्यातून चांगले प्रोजेक्ट करता येतील, चांगले उदयोग करता येतील. नागरीकांना चांगल्या सुविधा देता येतील. मी म्हणत नाही एलईडी घेऊ नका. एलईडी घेतल्याच पाहिजेत. पण ईइएसएल कडूनच घेतल्या पाहिजेत असं काही बंधन आहे का. आणि जर असं बंधन असेल तर त्याच्याबरोबर बारगनींग करा. आम्हाला जर ८०-८५ रुपयाला देणार असाल तर आणि जर समजा ४०-५० रुपयांमध्ये कोण देतेय. आम्ही त्यांच्याकडून घेतो, तुम्ही आम्हाला हया हया रेटमध्ये दया. आम्हांला या सुविधा त्या कंपन्या दयायला तयार आहेत. आपलं बारगनींग पॉवर वाढवा. आज तुपे साहेबांनी प्रपोजल आणले. तीन वर्षापूर्वी २०१५ ला परिपत्रक काढले. एलईडीबाबत कुठल्या प्रभागांनी रिक्वायरमेंट करायची नाही. असां कुठला साक्षात्कार तुपे साहेबांना झाला होता की एलईडी घ्यायच्या नाहीत. तर हे त्यांना माहीत होतं का. ईइएसएल कंपनी येणार आहे त्यांच्याबरोबर

,

आपल्याला साटलोट करता येईल. आज इथं काय चालले आहे ठेकेदार आणि ते महापालिकेचे अधिकारी मिळून संगनमताने ही महापालिका लुटण्याचे काम चालू आहे. आणि आम्ही १२८ प्लस ५ म्हणजे १३३ लोक फक्त बघायची भूमीका घ्यायला येतोय इथ. आयुक्त साहेब तुम्ही इथं कर्तेधर्ते आहात. तुम्ही ह्या प्रशासनाचे हेड आहात, मेन आहात. तुमचे प्रशासन काय करतय तुमची दिशाभूल करुन इथं अनागोंदीपणे कारभार चाललेला आहे. हा थांबला पाहिजे. जर थांबला नाहीतर आम्हाला सगळयांना रस्त्यावर उतरावे लागेल. एवढचं बोलून थांबतो, जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा.मिनल यादव** - मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आयुक्त साहेब गेल्या दोन महिन्यांपूर्वी मी आपल्याशी चर्चा केली होती. आपल्याला त्यासंदर्भात माझ्या प्रभागातील लेटर दिलेलं आहे. माझ्या प्रभागातील ४० ते ४५ एलईडी सहा महिन्यापूर्वी काढून नेलेत. आणि त्याठिकाणी साध्या पिवळया लाईट बसविल्या आहेत. त्याबद्दल मी संबंधित अधिका-यांकडे दोन महिने झाले फालोअप घेत होते फक्त म्हणत होते की रिपेअरींगला आहे. पण त्यांनाही माहीती नव्हते की ऍकच्युली एलईडी आहेत कुठे, म्हणजे अशी परिस्थिती होत असेल. तुमच्याकडून टेंडर निघाले. तुम्ही एलईडी बसविले परंतु नंतर परत ते महिन्याच्या आतमध्ये रिपेअरींगला निघतात. रिपेअरींग करुन ते ठराविक कालावधीमध्ये परत तीथेच लागले पाहिजेत. पण तसे न होता ते तसेच पडून कोण घेऊन जाते. संबंधित अधिका-यांचे त्या ठेकेदारांशी काय साटलोट याचे मला काही घेणदेण नाहीय. असे एलईडी जर काढले तर तुम्ही रिपेअरींगसाठी काही अटी शर्ती ठेवा की एवढया कालावधीमध्ये परत ते एलईडी बसले गेले पाहिजेत. आणि मग शेवटी एवढे महागाचे एलईडी आपण खर्च करुन बसवितो. ते महीन्यातच खराबच कसे होतात. तुम्हांला लेटर दिल्यानंतर मग संबंधित अधिका-यांनी त्याच्यावर कारवाई केली आणि मग महीनाभरानी सगळे एलईडी तिथे लागले. आणि मी दोन महीने चौकशी करत होतेतर सगळे म्हणत होते एलईडी रिपेअरींगला आहेत. म्हणजे एलईडी एका महिन्यात रिपेअरींगला कसे येतात, त्याची क्वॉलिटी कशी आहे. आणि त्याचबरोबर मेंटेनन्स करुन ते एलईडी किती दिवसाच्या आत तेथे लागलीत का नाही याची संबंधित सगळी माहिती तुम्ही घ्यावी. अधिका-यांना याबाबतीत सुचना दयाव्यात, धन्यवाद.

**मा. तुषार कामठे** - मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आज प्रशासनाचे पहिल्यांदा मनापासून अभिनंदन. आज आमच्या शहराला लुटण्याची एकही त्यांनी जागा

,

खाली सोडलेली नाही. एवढे दिवस मला वाटत होते की फक्त स्थापत्य विभागामध्ये महापालिकेची लुट होत असेल. गेली तीन महिने आम्ही पाहतोय. जेवढेही कामे निघालेली आहेत ती अबोव्हनी काम दिलेली आहेत. त्याच्यामध्ये प्रशासन देखील त्यांच्या सोबत आहे. त्याच लोकांचे टेंडर येतात, त्यांचेच पास होतात. तीच तीच लोक अशा प्रकारची कामाची पध्दत चालू आहे. आज सुध्दा वैशालीताईनी सांगितले. संदीप भाऊंनी सांगितले. ५० कोटी आपले वाचत असतील तर आपला अट्टाहास का. एलईडी टाकून घेतल्याच पाहीजे म्हणून. कोणीही आपल्याला सांगीतलतर आपण मान्य करायचे ही आपली पध्दत आहे का. आज प्रशासनाला वाटत असेल की आशिया खंडातील आपली एक नंबर महापालिका आहे. कितीही लुटले तरी कोणाला काय समजत नाही. पण आम्ही या शहराचे जन्मदाते आहोत. आम्ही आमच्या शहराचे नुकसान कदापि सहन करुन घेणार नाहीत याची आपल्याला आठवण करुन देतो. आयुक्तसाहेब गेल्या तीन महिन्यामध्ये आपण कुठला चष्मा लावून सहया करता ते काही समजत नाही. १९–१९ टक्के अबोव्हने आपण कामे देता. हयाच आपल्याकडे काय नियोजन आहे. कशा पध्दतीने टेंडर त्यांना देतो याची आपण चौकशी केली पाहिजे. आज आपण हा एलईडीचा विषय आणला आहे. हा मंजुर करु नये एवढी आपल्याला विनंती आहे. आज आम्ही इथे कुठल्या पक्षाच्या वतीने बोलत नाही. या शहराचे आम्ही नागरीक आहोत. मी आपल्याला सांगू इच्छितो की पक्ष काय भूमिका घ्यायची असेल ते घेईल त्याच्याशी माझा काही संबंध नाही मी जनतेसोबत आहे. त्या पापामध्ये आम्हाला सहभागी व्हायच नाही. इथ १३३ जण बसलेत. हे जनतेच्या हितासाठी चाललेले आहे. आयुक्तसाहेब आपल्याला विनंती आहे आपण हा विषय मंजुर न करता सदस्यांच्या मान्यतेने त्याची जी मानसीकता असेल त्याप्रमाणे करावा आणि आपल्याला मंजुर करायचा असेल तर त्याला माझा विरोध राहील. विरोध नोंदवून मंजुर करणेस आमची काही हरकत नाही, धन्यवाद.

**मा. निता पाडाळे** - मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आयुक्त साहेब, एलईडी दिवे बसविणे म्हणजे वीज बचत. आणि वीज बचत म्हणजे आर्थिक बचत आपण जर एलईडी बसविले तर त्यांचा फायदा ईइएसएल कंपनीला किती होणार आहे. ते इथं आपण नमुद करावं. त्याचप्रमाणे एलईडी दिवे बसविताना आपण मेजेरमेंट घेतलेल आहे. ते मेजेरमेंट घेतल्यानंतर त्यानुसार या दिव्यांचा रस्त्यावर हा प्रकाश किती पडणार आहे, हे समजू शकेल. परंतु आयुक्तसाहेब एका वर्षामध्ये दिव्यांचा प्रकाश अर्धा होतो. सात वर्षानंतर

,

परत काय होणार आहे त्याचा पण तुपे साहेबांनी खुलासा करावा. त्याचप्रमाणे सातवर्षा पुर्वी जी पाईपची फिटींग बसवली आता वाघेरें भाऊनी सांगितलं त्या सर्व फिटींग्ज काय झाल्या ते सांगीतल, मी आता परत सांगत नाही. परंतु त्याची पण चौकशी आयुक्तसाहेब झाली पाहिजे. एकत्रीत एलईडी बसविण्याच्या अट्टाहासापायी मला वाटतं मी त्यावेळेस विधी समितीमध्ये होते. सन २०१५ मध्ये तर त्यावेळी विधीमध्ये हा विषय आला होता. फक्त एकत्रीत एलईडी हेच आम्ही ऐकत होतो. प्रभागामध्ये स्वतंत्र टेंडर काढले जाणार नाही असं ठामपणे आम्हाला तिथे तुपेसाहेबांनी सांगितले होते. परंतु आयुक्तसाहेब काही प्रभागामध्ये स्वतंत्र टेंडर काढले गेले. त्याचा आता त्यांनी खुलासा करावा की कोणत्या प्रभागात स्वतंत्र टेंडर काढले ते. असा दु‌जाभाव का. आयुक्तसाहेब आपल्याला सगळे नगरसेवक हे सारखेच आहेत. आपण सगळयाच प्रभागाचे टेंडर काढायला पाहीजे होते. हा दु‌जाभाव केलेला आहे. त्याचा सुध्दा खुलासा करावा. प्रत्येक प्रभागात मी तर म्हणते स्वतंत्र टेंडर काढावे. त्याचप्रमाणे आयुक्तसाहेब पुर्वी जे एलईडी ठेकेदार होते. त्या ठेकेदारांकडून आपण १० टक्के बिलाची रक्कम ही पाच वर्षासाठी राखून ठेवत होतो. परंतु तुपे साहेब आल्याच्यानंतर त्या अटी-शर्ती पूर्णपणे बदलल्या गेल्या. आणि आपण आता ठेकेदारांची ती रक्कम राखून ठेवत नाही. हे नेमके कोणत्या ठेकेदारांसाठी काम चाललेले होते. का त्या कामामध्ये काहीतरी सेटलमेंट झाली म्हणून अटी-शर्ती बदलल्या. आयुक्तसाहेब विदयुत विभागाच्या या पूर्ण टेंडरमध्ये अटी शर्ती बदलल्या गेल्या. पुर्वी जे चालल होत ते नाही तरी त्याचा सगळा खुलासा तुपे साहेबांनी दयावा. हीच विनंती करते. त्याचप्रामणे नांदेडमध्ये मी पेपरला वाचले होते. की नांदेडमध्ये याच कंपनीच काम झाल तर ते एलईडीचे काम बंद करणेत आले. तर ते तुपे साहेबांनी ते वाचल असेल. ते काय झाला त्याचा सुध्दा  खुलासा करावा. एवढीच आपल्याला विनंती करते,  थांबते धन्यवाद.

**मा. मंगला कदम** -  मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह मला असं वाटतं की विरोध याला आहेच. परंतु आज सभागृहाचे जर चित्र बघितले तर आजच्या या विषयामध्ये आपल्याला होणारा ५० कोटीचा लॉस हा विचार करता हा विषय दप्तरी दाखल करावा अशी मी विनंती करते. आम्ही आताच तुम्हाला सांगतो महापौर साहेब हा विषय जर तुम्हांला करायचा असेल तर आम्ही मतदानाची मागणी करणार आहोत. आताच आमचे चार जण उभे राहतील. परत तुम्ही असे म्हणू नका की तुम्ही चार जण उभे राहिले नाहीत मतदानाची मागणी केली नाही. तरी हे जेवढे विश्वस्त आहेत आज त्यांना कळालेलं आहे की

,

या विषयामध्ये नेमके काय आहे. प्रत्येकाचा याला विरोध आहे. एवढा विरोध होतोतर हा आपण विषय करावा असं मला वाटत नाही. आणि हा विषय करु नका आम्ही तर करणारच याच्यावर आंदोलन. पण आमच्यासोबत ही सगळी मंडळी आहेत. ही कंपनी ती कंपनी त्याच्यामध्ये काय आहे. साडेदहा कोटीमध्ये आपले काम होणार आहे. एवढे सात वर्षे आपण दहादहा कोटी देणार आहोत. ७० कोटी देणार आहोत. आपले काम २० कोटीमध्ये होईल. २४ कोटीमध्ये होईल. जे काय होईल ते रितसर होईल. तुम्ही टेंडर काढा त्याप्रमाणे करा. त्याच्यामध्ये जर आपल्याला प्रॉफीट होणार असेल तरी हरकत नाही. जरी हा दप्तरी दाखल केलातरी तुम्ही परत तीन महीन्यानी विषय आणु शकता. साहेब आपण तीनतीन वर्षे थांबतो. आम्ही तीनतीन वर्षे बघतोय आमच्या डोळयांनी. विषय आमचे होत नाहीय. तीन वर्षापासून फाईली पडून आहेत. तीन तीन वर्षे टेंडर झालेल्या फाईल्स पडून आहेत. तीन महिने थांबण्याने मला नाही वाटत काही फरक पडेल. आणि म्हणून जर एवढे पैसे आपले वाचणार असतील. तर १०० टक्के तपासून घ्यावे कमिशनरसाहेब. आम्हाला असं वाटत नाही की तुमच्या हातून एवढी मोठी चूक व्हावी हि विनंती. मा महापौर साहेब, मी पक्षनेत्यांना आणि महापौरांना विनंती करेन की आताच्या सभागृहाच्या चित्रानुसार हा विषय दप्तरी दाखल करणेत यावा अशी विनंती करते. मा. महापौर साहेब सगळा खुलासा करा आणि जर विषय करायचा असेल तर आमची मतदानाची मागणी आहे. नगरसचिव आताच तुम्हाला कल्पना देतो. मतदानाची मागणी चार जणान करावी लागतेतर आम्ही चार जण उभे आहोत.

**मा. दत्तात्रय साने-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर आज भाजपाच्या नगरसेवकांच्या डोक्यामध्ये खरा प्रकाश पडला आहे. असे मी या निमित्ताने म्हणेल किती भष्ट्राचार चालला आहे. या महानगरपालिकेमध्ये खरी किती लूटमार होतेय. कोण किती कोणाच्या पळवापळवी करतयं. आम्ही आतापर्यंत जे भ्रष्टाचाराचे आरोप केलेत ते दिड वर्षानंतर आमच्या सन्मा.सर्व नगरसेवकांना कळाल्याबद्दल मी माझ्या सर्व सन्मा. नगरसदस्यांचे मनापासून अभिनंदन करतो. सन्मा.आयुक्तसाहेब ह्या विषयाबाबत आपण सर्व नगरसदस्यांसमवेत मिटींग घेतली होती. त्या मिटींगमध्ये आपण एक शब्द काही तरी बोलले होते तो आठवलातर बरं होईल. सेव्हींग एनर्जीचा विषय आल्यानंतर आपण ८५ आणि ६५ याचा हिसाब त्याला जाऊन विचारला. त्यांच्या किंमतीमध्ये आणि आपल्या किंमतीमध्ये जवळपास ५० ते ६० कोटीचा फरक आहे. त्याच्यामध्ये तफावत आहे. हे सगळे आपल्याला

,

माहिती असताना सुध्दा आयुक्तसाहेब आपण हा विषय पुन्हा पुन्हा सभागृहामध्ये आणून विनाकारण जे काही करायचे ते पध्दतीन चुकीचस विषय आणून महानगरपालिकेची लूट करण्याचे काम आज या विषयातून आम्हाला दिसत आहे. ४५ ते ५० टक्के एलईडी आपण स्वत: बसविले असताना उरलेले ३० ते ४० टक्के एलईडी बदलायचे राहिले असताना याच कंपनीचा आग्रह का. महाराष्ट्र शासनाचा निर्णय, केंद्रशासनाचा निर्णय, त्यांनी आपल्यावर लादलेले निर्णय दिला अनेक वेळा आपल्यावर असे प्रसंग येत असताना मग केंद्र आणि राज्य शासन आपली महानगरपालिका चालविते काय किंवा केंद्र किंवा केंद्रातल्या भाजपचा रिमोट कंट्रोल आपल्या महानगरपालिकेवर आहे की काय असं या निमित्ताने मला जाणवत आहे. पाठीमागे मला वाटतं तुपे साहेब आपण अहमदाबादला गेला होता. अहमदाबादच्या दौ-यामध्ये किंवा तीथल्या तीन दिवसांच्या त्या एलईडीच्या विषयामध्ये तोच अहवाल आपण या निमित्ताने तुम्ही आम्हाला देणे गरजेचे आहे साहेब. अहमदाबादचा अहवाल काय आला होता. या संदर्भात या विषयावर जी चर्चा झाली आहे त्या अहवालामध्ये जे काही मिळालेले आहे तो अहवाल आम्हाला प्राप्त करुन देणे गरजेचे आहे. जर या सर्व विषयामध्ये आताच मला वाटते की तुषारभाऊनी चांगला विषय मांडलेला आहे. आमचे संदीप वाघेरेंनी सुध्दा चांगला विषय मांडलेला आहे. आशाताईंनी त्या अभ्यासू असताना या विषयाला विरोध मांडलेला आहे. आमच्या मंगलाताईंनी, वैशालीताईनी सुध्दा सांगितलेले आहे. एवढे सगळे नगरसदस्य आपल्याला हे सगळं सांगतात हा चुकीचा विषय आहे म्हणून तर मग सत्ताधा-यांना या विषयामध्ये काय रस आहे की काय. चुकीचा हा विषय असताना सभागृहामध्ये आणण्याचा प्रयत्न करता की काय. महानगरपालिकेच्या या माध्यमातून भ्रष्टाचाराचा अजून कुठला पुरावा तुम्हाला या माध्यमातून  हवा आहे असं आम्हाला वाटतयं. महापौर साहेब माझी आपल्याला विनंती आहे, की सरळ असा जर विषय असेल तर मंगलाताईंनी आताच सांगितले आहे. हया विषयाला आमचा विरोध असेल. या विषयाचे मतदान घेतल्याशिवाय हा विषय तुम्ही मंजुर करु नये. मतदानामध्ये आम्हाला कळेल तरी या भ्रष्टाचारामध्ये नक्की कोण सामील आहे. कोण तोंडावर बोलणार आहे हे दिसेल. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे महापौर साहेब हा विषय अनेक दिवस विषयपत्रिकेवर आलेला आहे. याच्यावर नगरसेवकांची सादकबाधक चर्चा झालेली आहे. आयुक्त साहेब त्या मिटींगमधून वॉकआऊट झालेले आहेत. आयुक्त ती मिटींग सोडून गेलेले आहेत मग आयुक्तांना सुध्दा त्यांच्या स्वत:च्या मनाला ते पटत नाही. की हा विषय चुकीचा आहे त्यांना वाटतय. पण त्यांना कोणाचे प्रेशर आहे मला माहीत नाही.

,

हया विषयामध्ये कोणाचा इंटरेस्ट आहे. मग हा इंटरेस्ट कोणासाठी चालला आहे. या विषयाला अनेक फाटे फुटलेले आहेत. असे सगळे प्रकार यामधून आयुक्तसाहेब निष्पन्न झालेले आहेत. म्हणून आपल्याला महापौर साहेब विनंती आहे. जे काही करायचं असेल ते तुम्ही तुमच्या जोरावर करणार आहात. त्याच्या आधी आमचा विरोध नोंदवून मतदान घेऊन हा विषय करावा. अशी आपल्याला विनंती करतो. आणि हया विषयाबाबत नगरसदस्यांनी मागितलेला खुलासा केल्यानंतर मला परत बोलायला दयावे अशी मी विनंती करतो.

**मा. बापू उर्फ शत्रुघ्न काटे** - मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. खरतर बराच वेळ हा विषय संपुर्ण सभागृह त्याला विरोध करीत आहे अस मला वाटतय. बरेचजण बोलणार आहेत. दत्ताकाकांनी सांगितले की भारत आणि पाकिस्तानच्या सदस्यांच्या डोक्यामध्ये प्रकाश पडला आहे. ऑलरेडी ज्या प्रभागामध्ये मागच्या पाच वर्षातही असाच प्रकाश पडला होता. त्यावेळेस तीन पाईपच्या फिटींग आल्या होत्या. ते २५ टक्के पण झाले नाही. तो प्रकाश पण टाकण्याचे काम आता परत प्रशासन करतंय आणि हा विषय सत्ताधा-यांनी आणलेला नाही. हा विषय प्रशासनाने आणलेला आहे. माझाही या विषयाला विरोधच आहे. आपण ७३ कोटीच्या ऐवजी २५ कोटीमध्ये १५ वर्षे फिटींग करु शकतो. आजही त्या कंपन्या आपल्याकडे आहेत. त्या मेंटेनन्स पंधरा वर्ष करतील. सांगण्याचा एकच विषय आहे की ब-याच जणांनी त्याच्यावरती माहिती दिलेली आहे. मा. महापौरांना विनंती आहे, हा विषय नका वाढवू. त्याच्यावर पक्षनेतेही बोलतील. हा प्रशासनाचा विषय आहे हा एक तर फेटाळून लावा. हेच सभागृहाचे म्हणणे आहे. हयाच्यामध्ये कोणालाही रस नाहीय. ना सत्ताधा-यांना ना विरोधकाना. महानगरपालिकेचा जेवढा काही चांगला फायदा होईल त्याच्याच नवीन कुठल्या ठिकाणी काही करता येईल त्यात ५० कोटी वाचतील, ७० कोटी वाचतील जे काय वाचतील ते आपण वाचऊ. पण हा विषय फेटाळून लावा अशी मी सभागृहापुढे विनंती करतो आणि थांबतो.

**मा.राहुल कलाटे** - मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. महापौर साहेब, गेले अर्धा तास शहरामध्ये जो एलईडीमार्फत उजेड पाडण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून चाललाय त्याला सगळयानी मिळून विरोध केला आहे. प्रेझेंटेशन ज्यावेळेस गटनेत्यांना दिले गेले त्यावेळेस आयुक्तांनी देखील काही प्रश्न उपस्थित केले परंतु त्या कंपनीला त्याच निरसन करता आले नाही. साहेब सुध्दा त्या मिटींगमधून उठून गेले. सर्व मिळून या विषयाला विरोध

,

करत असताना हा विषय शहरावर लादण्याचा प्रयत्न करु नये. आपण पाहील असेल की इलेक्ट्रॉनीक आणि ऐशियन कंपनीकडून असाच करार केला होता, तो करार देखील सात वर्षाचा होता. परंतु पाच वर्षामध्येच तुम्ही नवीन प्रक्रियेला सामोरे जात आहात. इलेक्शन झाल्यापासून दिड वर्षापासून आम्ही ऐकतोय. एलईडी आज देतील, उदया देतील प्रभागात गेल्यानंतर लोकांची मागणी आहे. परंतु दिडवर्षे तुपेसाहेब तुम्ही शासनाच्या जीआरची वाट पहात होता की काय ही देखील शंका सगळयांना येते. साहेब चार वेळा हा विषय तहकूब केला गेला. शंका येण्याचे कारण असं की चार वेळा तहकूब केला असताना आपण काय वाटाघाटी करीत होता की काय मंजुर करण्यासाठी. पहिल्या वेळेसच हा विषय तुम्ही का फेटाळला नाही. असंच तुम्ही बंधनकारक म्हणले होते. सोलरच्या बाबतीत सुध्दा. बंधनकारक कोणाला आहे की ज्या महापालिकेची स्वत:ची आर्थिक ताकद नाही त्यांना बंधनकारक आहे जे की ते करु शकणार नाहीत. मला वाटते कालही बालेवाडीच्या भाषणात त्याचा उल्लेख मा.पंतप्रधानानी केला. तुमची कॅपॅसिटी असताना तुम्ही बारगनींग करुन महापालिकेचे पैसे वाचवू शकत असताना तुम्ही कशासाठी हा घाट घालताय. बंधनकारक आहे. राज्याच्या नावावर बिले फाडताय. केंद्राच्या नावावर बिले फाडताय हे कोणासाठी. महापौर साहेब कुठेतरी आपण प्रक्रिया राबवीत असताना लोकांना विश्वास आला पाहीजे की ही प्रक्रीया राबवत असताना याठिकाणी कुठल्याही प्रकारे गैरकाम, गैरवर्तणूक ना अधिका-यांकडून झाले पाहीजे, नां सत्ताधा-यांकडून झाले पाहिजे. माझी आज सुध्दा पुन्हा एकदा मागणी आहे की तुम्ही हा विषय मंजुर करीत असताना मतदान घ्यावे. जे विरोध करतात त्यांचा खरच विरोध आहे का हे सुध्दा आज सगळयांना कळेल. नाहीतर इकडे विरोध करायचा आणि तिकडे फोन करुन मंजुर करायला सांगायचे. आयुक्त साहेब आपल्याबरोबरची विश्वासर्हता या शहरात वाढली पाहीजे ती टिकली पाहीजे त्यामुळे असे चार-चार वेळा तहकूब केलेले विषय आपण फेटाळून लावा अशी मी याठिकाणी महापौरांना विनंती करतो.

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर हा विषय दोनतीन मिटींगला, चार मिटींगला येतो, जातो. परंतु मला एक गोष्ट मनापासून या सभागृहाच्या निदर्शनास आणून दयायची आहे की ज्यावेळेस परिस्थिती अशी असते की भाजपाच्या नगरसेवकांनी एखादया विषयाला विरोध केला, त्याच्यावरच आपले मत व्यक्त केले की कधी कधी विरोधकांच्या पोटामध्ये उकळया फुटायला लागतात. आनंद वाटतो,

,

परिस्थिती अशी आहे की मा. महापौर या संदर्भामध्ये दत्ताकाका तुम्ही बोलताना मी मध्ये बोललो नाही. मी कमिशनरांशी बोलत होतो. खरतर निताताई पाडाळेंचे भाषण सर्वांनी ऐकले. तुम्ही पण सभागृहामध्ये ऐकत होता. निताताई हे खरे आहे की मागच्या काळामधील एलईडीची परिस्थिती तुम्हीच सांगत होते. कारण ही परिस्थिती तुम्हाला माहीत आहे. खरतर आम्ही तर महापालिकेमध्ये सत्तेमध्ये आल्याच्यानंतर एलईडी आम्ही नाही आणल्या. म्हणजे आताची जी परिस्थिती या शहरामध्ये एलईडीची आहे ती परिस्थिती या शहरामधल्या लोकांना माहीत आहे की त्याची परिस्थिती काय आहे. खरतर या संदर्भामध्ये अजुन निर्णय काय करायच काय नाही, खरतर ताई मी तुमचा खुप आदर करतो पण हा विषय दोन जीबीला तुमच्या सदस्यांच्या आग्रहासाठी आपण तहकूब केला होता. तुमच्या सदस्यांच्या. मी काही सगळया सभागृहाच्या समोर एखादी गोष्ट सांगणार नाही. पण वस्तुस्थिती अशी आहे. राहुलदादा याही संदर्भामध्ये खरतर भारतीय जनता पार्टीच्या सरकारचे धोरण एवढं निश्चित आहे की ज्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नसेल त्या महापालिकेच्या माध्यमातून एलईडी बसवली पाहिजे. कर्मधर्म सहयोगाने आपल्या महापालिकेची परिस्थिती चांगली आहे. त्यामुळे आपल्याला अशीही परिस्थिती वाटते की याच्यामध्ये टेंडरींग झाले पाहिजे निविदा आल्या पाहिजेत. त्या केल्या पाहिजेत ही परिस्थिती आम्हाला माहीत आहे. पण ज्यावेळेस एखादा विषय महापालिकेच बजेट करण्याच्या संदर्भामध्ये आपण सगळेजण काम करतोय. पण या संदर्भामध्ये मी अधिक माहिती घेतली. या विषयाच्या संदर्भामधून निर्णय घ्यायचा आहे. खरतर आम्ही या गोष्टीची वाट बघत नाही बसलो की हा विषय आजच्या सर्वसाधारण सभेमध्ये या विषयावर काय निर्णय होणार आहे. प्रशासनाने मागच्या काळामध्ये मागच्या दोन महिन्यापूर्वी प्रशासनाला सुचना केली होती की हा विषय दोनतीन वेळा तहकूब केला जातो. त्या विषयावर निर्णय काय होईल तो होईल. राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाने या संदर्भामध्ये आपला निर्णय घ्यावा. खरतर एखादया विषयाच्या संदर्भामध्ये सभागृहामध्ये विरोध झाला त्यामुळे अशी परिस्थिती नाही. खरतर सभागृह हे चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी असतं. एखादा विषय सभागृहामधल्या सदस्यांना जर अपचनी पडत असेल मला असं वाटतं की भारतीय जनता पार्टी ही चांगल्या पध्दतीने काम करते, पारदर्शी पध्दतीने काम करते. सभागृहामधल्या सदस्यांना जर ही परिस्थिती, काका मला माहीत आहे लक्षात ठेवा सगळया गोष्टी मला जर काढायच्या तर हे लक्षात ठेवा सिमाताई इथं साक्षीदार आहेत. खरतर त्या विषयामध्ये मला जायचं नाही. परंतु या सभागृहामधल्या सर्व सन्मा.

'

सदस्यांना  हा विषय जर फेटाळून लावावा असे वाटत असेल तर मी महापौरांना अशी विनंती करतो की या संदर्भामध्ये आपण हा विषय फेटाळून लावावा. एक लक्षात ठेवा. ही परिस्थिती या शहरामध्ये नागरीकांच्या संदर्भामध्ये आहे. एलईडीसाठी ज्या ज्या वेळी एक एक नगरसेवक आपल्या विदयुत विभागाच्या अधिका-यांना एक गोष्ट सांगतो की साहेब माझ्या प्रभागामध्ये १०० एलईडी आल्या पाहिजे. माझ्या प्रभागामध्ये २०० एलईडी आल्या पाहिजे. एवढच सभागृहामध्ये तुम्हाला सांगतो की थोडासा कळ आपल्याला पुढच्या काळामध्ये आपण टेंडरींगच्या माध्यमातून एलईडी घेण्यासाठी आपल्याला त्रास सहन करावा लागेल. आणि खरतर ही राज्य शासनाची आणि केंद्र शासनाची कंपनी आहे. ही काय कंपनी एखादया प्रायव्हेट माणसाची नाही. त्यामुळे खरतर हे तुमच्या सगळयांचे हे म्हणणे आहे. हयाच्यामध्ये हयाचा इंटरेस्ट आहे, त्याचा इंटरेस्ट आहे. आम्ही भाजपावर आरोप केलेत की आम्ही किती स्मार्ट आहे. मा. महापौर साहेब विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ३२७ — विषय क्रमांक- ५

दिनांक- २०/१२/२०१८ — विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/मुका/तां.वि/३४७/ २०१८, दि.१६/०७/२०१८

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१५, दि.२८/०८/२०१८

३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २८५ दि.२७/०९/२०१८

४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- ३१३ दि.३१/१०/२०१८

विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल - ८१ — प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकटकेले.

-------

,

**मा. शारदा सोनवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३२८ विषय क्रमांक- ६
दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.शर्मिला बाबर, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव –

२) मा.शिक्षण समितीकडील ठराव क्र.३४, दि.१९/१०/२०१८

मा.शिक्षण समिती ठराव क्रमांक 30 दिनांक 4.10.2018 नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाकडे सेवावर्गीकरण करणेकामी ग्रामविकास विभाग यांच्याकडील शासन निर्णय दिनांक 29.06.2017 नंतर पतीपत्नी एकत्रीकरण एकतर्फी बदली सेवावर्गीकरणानुसार प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून कामकाज सुरू करणेस व दिनांक 29.6.2017 पूर्वी प्राप्त झालेले अर्ज व प्रस्ताव निरस्त करणेकामी व तसे निर्णय घेऊन संबंधितांना कळविण्यास मान्यता देणेत येत आहे आणि त्या नुसार दिनांक 29.6.2017 नंतर छाननी मध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावा नुसार शिक्षकांच्या पती –पत्नी एकत्रीकरण व एकतर्फी बदली सेवा वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे त्यानुसार..

1) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाकडे सेवा वर्गीकरण करणेबाबत जिल्हा परिषद/नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिका येथील इच्छुक उमेदवारांनी पती-पत्नी एकत्रीकरण/ एकतर्फी ने सेवा वर्गीकरण करणे बाबत सन 2004 पासून ते दिनांक 29.06.2017अखेर एकूण 215 प्रस्ताव व शासन निर्णय दिनांक 29.06.2017 नंतर प्राप्त प्रस्तावानुसार छाननीचे कामकाज चालू आहे. सदरचे प्रस्ताव हे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी / मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी / मा.शिक्षणाधिकारी / मा.आयुक्त महानगरपालिका / मा.प्रशासन अधिकारी यांचे स्वाक्षरीने सादर केलेले प्रस्ताव आहेत.

२) मा.शिक्षण उपसंचालक पुणे यांच्याकडील जा.क्र.शिउसं/प्राथ-2/पू/वी/2013-14/25840 दिनांक 11.12.2014 नुसार पुणे विभागांतर्गत जो पर्यंत अतिरिक्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांचे संपूर्णपणे समावेशन होत नाही तोपर्यंत कोणत्याही प्रकारच्या बदलीस मान्यता देण्यात येऊ नये व बदलीअंती सदर शिक्षकास हजर करून घेऊ नये तसेच मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे परिपत्रक दिनांक

,

20.05.2004 नुसार बदली प्रकरणाबाबत कार्यवाही करावी व शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत पती-पत्नी एकत्रीकरण आंतरजिल्हा बदली आणि एकतर्फी बदलीस मान्यता देण्यात येऊ नये असे कळविण्यात आलेले आहे.

3) त्याअनुषंगाने या कार्यालयाकडील जाक्र/शिक्षण/आस्था/1/कावी/849/14 दिनांक 19.12.2014 नुसार मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक दि 20.5.2004 चे परिपत्रक मागणी करण्यात आलेली होती. शासन निर्णय दिनांक 29.06.2017 अन्वये इच्छुक उमेदवारांनी मार्गाने विनंती अर्ज केल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अशा कर्मचा-यांना नगरपालिका नगरपरिषदा किंवा महानगरपालिका यांच्यामध्ये परस्पर सहमत होतील अशा अटी व शर्तीवर कार्यमुक्त करतील असे नमूद केले आहे. सबब दिनांक 29.06.2017 पुर्वीचे प्राप्त असलेले प्रस्ताव निरस्त करणेबाबत निर्णय घेऊन तसे संबंधितांना कळविण्यास मान्यता असावी.

4) मा.उपसंचालक कार्यालय पुणे यांच्यामार्फत संचमान्यता शिक्षक निश्चिती तयार केली जाते व त्यानुसार कार्यरत पदांना अनुसरून राज्य शासनामार्फत 50 टक्के अनुदान प्राप्त होते उर्वरित 50 टक्के वेतन पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत केले जाते. सदरची रिक्त पदे सेवावर्गीकरणाने भरावयाची असल्यास सदरचा विषय हा वेतन व वेतनोत्तर बाबींशी संबंधित असल्याने सदरचा आर्थीक भार मनपाला सोसावा लागणार आहे. त्यासाठी मनपा अंदाजपत्रकात संबंधित आर्थिक वर्षासाठी वाढीव तरतूद उपलब्ध करावी लागणार आहे.

5) मा.उपसंचालक कार्यालय पुणे, विभाग पुणे, यांनी सन 2017-18 रोजीच्या संचमान्यतेनुसार मान्य केलेल्या पदांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| ºÉxÉ 2017-18 SªÉÉ ºÉSÉ¨ÉÉxªÉiÉxÉºÉÉ® ¨ÉÆ®ÉÚ® ¨ÉÉvªÉ¨ÉÉSªÉÉ ÉÊ®Ci {ÉnÉSÉÉ iÉ{ÉÉ¶ÉÒ± | | | |
|---|---|---|---|
| ºÉÆ´ÉMÉÇ | ¨ÉÉxªÉ {Énä | EòÉªÉÇ®iÉ {Énä | ÉÊ®Ci {Énä |
| ¨ÉÖJªÉÉvªÉÉ{ÉEò | 78 | 72 | 06 |
| ÉÊ¶ÉIÉEò | 1056 | 932 | 124 |

,

6) विभागीय आयुक्त मागासवर्ग कक्ष विधानभवन, विभागीय आयुक्त कार्यालय पुणे, विभाग पुणे, यांच्याकडून मराठी माध्यम शिक्षक संवर्गाचे बिंदुनामावली दिनांक 27.09.2017 रोजी तपासण्यात आलेली आहे.

7) वरीलप्रमाणे अनु. क्र. १ ते ७ विचारात घेता दि.29.06.2017 रोजीनंतर छाननीमध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार शिक्षकांचे पती-पत्नी एकत्रीकरण व एकतर्फी बदली सेवा वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. शर्मिला बाबर -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदरचा ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.दत्तात्रय साने-** मा. महापौर साहेब, तुम्ही असं काय करताय. मी हात वर केलाय बोलण्यासाठी आणि तुम्ही विषय मंजुर करताय. बोलू दया आम्हाला. दादागिरी करुन सभागृह चालविणार आहे का.

**मा. महापौर** – विषय मंजूर झाला की तुम्ही हात वर करायचा, काका तुम्हाला बोलायच असेलतर बोला.

[सभागृहामध्ये गोंधळ]

**मा. दत्तात्रय साने-** विषय मंजुर झाल्यानंतर काय बोलणार आम्ही.

**मा.महापौर -** काका तुम्ही तिथे उभे राहून बोला तुम्हाला काय बोलायचे ते बोला. तुम्हाला काय विरोध करायचा आहे तो विरोध करा. तुम्ही हात वर करायचा होता ना. तुम्हांला बोलायच नाहीतर पुढचा विषय वाचावा.

[सभागृहामध्ये गोंधळ]

**मा. नामदेव ढाके-** मा. महापौर साहेब विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो-

,

ठराव क्रमांक- ३५१ विषय क्रमांक- ७

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील क्र.मसाभां/५/कावि/३८४/२०१८ दि.३१/०८/२०१८

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २९० दि.२७/०९/२०१८

३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- ३१५ दि.३१/१०/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम.रुग्णालयाकरीता Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System ही मशीन ई-निविदा सुचना क्रमांक-17/2011-2012 मागवून मे. मनाली एंटरप्रायझेस यांनी सादर केलेले दर स्विकृत करुन ( कमी केलेल्या दरानुसार ) खरेदी करणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक - 48, दिनांक 17/04/2012 अन्वये मे. मनाली एंटरप्रायझेस यांचेडून प्राप्त झालेल्या ई-निविदा दरामध्ये कमी करुन दिलेल्या दरानुसार करारनामा करुन खरेदी करण्यास व येणा-या र.रु. 2,79,24,750/- चे खर्चास मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने मे. मनाली एंटरप्रायझेस यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयाकरीता Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System पुरवठयाकामी मे. मनाली एंटरप्रायझेस यांना मसाभां/5/कावि/348/2012, दिनांक 31/05/2012 अन्वये आदेश देण्यात आला होता. आदेशात नमुद केलेनुसार मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी मशिनचा पुरवठा दिनांक ०१/१२/२०१२ रोजी केलेला आहे. सदर मशिनचे दिनांक ३०/०१/२०१३ रोजी इनस्टॉलेशन केलेले आहे. मशिनचे इनस्टॉलेशन झालेनंतर मशिन कार्यरत होती. तथापि काही कारणास्तव मशिन बंद असलेने Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हया मशीनची ई-निविदेत नमुद केलेले स्पेशिफिकेशन प्रमाणे तांत्रीक तपासणी मा.प्रोफेसर, इन्स्ट्रूमेंटेशन अण्ड कंट्रोल,कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडून करुन घेण्यात आलेली आहे. त्यांनी अहवालानुसार संबंधित ठेकेदाराकडून दुरुस्ती करुन घेण्यात येवून मशिन चालू करण्यात आलेली होती. तथापि काही कालावधी नंतर सदरची मशिन कुलिंग सिस्टिम अभावी बंद होती. वाय. सी.एम. रुग्णालयात उपलब्ध करुन दिलेली एच.बी.ओ.टी. मशिन कुलिंग सिस्टीम बंद असलेने मशिन बंद स्थितीत असलेने दिनांक २५/०४/२०१५ रोजी मे.कास्को

,

इंडस्ट्रीज प्रा.लि. यांनी दिलेल्या सर्व्हिस रिपोर्ट नुसार मे.मनाली एंटरप्रायझेस यांचेकडून सदर मशिनकरीता आवश्यक लागणारे स्पेअर पार्टस् खरेदीकामी कोटेशन सादर केलेले होते. एच.बी.ओ.टी. मशिन दुरुस्त करणेकामी र.रु. ७,१७,५००/- इतका अपेक्षित खर्च येणार असल्याने प्रस्ताव सादर करुन त्यास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-१८२५७, दिनांक २९/११/२०१६ अन्वये एच.बी.ओ.टी. मशिन दुरुस्त करणेकामी आवश्यक स्पेअर पार्टसचा पुरवठा करुन दुरुस्त करणेकामी मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी सादर केलेल्या कोटेशनमधील कमी करुन दिलेल्या र.रु. ७,१७,०००/- चे खर्चास मान्यता दिलेली होती. मा.स्थायी समिती ठरावाच्या अनुषंगाने मे.मनाली एंटरप्रायझेस यांना पत्र क्र.YCMH/भां/२/कावि/३५४/२०१६, दिनांक ३०/१२/२०१६ अन्वये नोटराईजड प्रतिज्ञापत्र, करारनामा व आवश्यक एफ.डी.आर. जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी दिनांक ०१/०३/२०१७ रोजी करारनामा करुन दिलेला आहे. सदरचा करारनामा दिनांक ०२/०३/२०१७ रोजी मा.स्थायी समिती कार्यालयाकडे सील करणेकामी पाठविण्यात आला होता. दिनांक ३०/०६/२०१७ पर्यंत करारनामा सील झालेला नसलेने एच.बी.ओ.टी. मशीनचा दुरुस्ती आदेश निर्गत करण्यात आला नव्हता. तसेच पुर्वीच्या दरपत्रकाची वैधता संपल्यापमुळे संबंधित प्रक्रिया रद्द करुन त्रयस्थ संस्थेची एच.बी.ओ.टी. मशीन चालविणेकामी नेमणूक करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला होता.

मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हीमशीन चालविणेस देणेकामी Expression of Interest वृत्तपत्राचे विशेष रोटेशन घेवून प्रसिध्द करण्यात आले होते. त्या अनुषंगाने मे. बॅरोमेडिक हेल्थकेअर प्रा. लि. व मे. ऍडव्हॅंट हेल्थकेअर यांचे मार्फत प्रस्ताव प्राप्त झालेले होते. सदर प्रस्तावाचा विचार करुन वाय. सी. एम. रुग्णालयातील Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हीमशीन कार्यान्वित करुन चालविणेस देणेकामी मे.क्रिसिल इन्फ्रास्ट्रक्चर सोल्यूशनस प्रा. लि., यांचे मार्फत RFP तयार करण्यात आलेली आहे. Y.C.M. Hospital करीता उपलब्ध करुन दिलेली HBOT मशिन महागडी असून तिचा वापर होणे आवश्यक आहे. सदयस्थितीत वाय.सी.एम. रुग्णालय येथे प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता असले मुळे HBOT मशिन चालविणे शक्य होत नाही. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ (ब) नुसार Request for Proposal Selection of Operator for Operation and Maintenance of the existing HBOT

,

centre at Y.C.M. Hospital साठी ई-निविदा प्रसिध्द करण्याकरीता मा. महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे.

सबब, वाय. सी. एम. रुग्णालयातील Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हीमशीन चालविणेस देणेकामी M/s. Crisil यांनी Request for Proposal Selection of Operator for Operation and Maintenance of the existing HBOT centre at Y.C.M. Hospital चा मसुदा सादर केलेला असून Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System ही मशीन चालविणेस देणेची ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. हर्षल ढोरे-** मा. महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

[सभागृहामध्ये गोंधळ]

**मा. सुलक्षणा धर** - मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह...

**मा. महापौर-** धरताई तुम्ही बोला. तुम्हाला बोलायला दिले आहे ना. मग बोला ना तुम्ही. बोला तुम्ही बोला. ताई तुम्ही बोलणार आहात ना. मग बोला ना. एचबीओटीवरच बोलायचे आहे ना. ताई तुम्ही बोला. वि.क्र. ७ वर तुम्हांला बोलायच आहेतर बोला.

[सभागृहामध्ये गोंधळ]

**मा. सुलक्षणा धर** - मा.महापौर साहेब त्यांचा तर विषय क्लिअर करा आधी. मग माझ्याशी बोला. तुमचं लक्षच नाहीय तर मी बोलणार कोणाशी.

[सभागृहामध्ये गोंधळ]

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह सर्व सदस्यांचे भावना लक्षात घेता ही सभा आज सायंकाळी ५.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा. नामदेव ढाके** - मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेता ही सभा आज दि.२०/१२/२०१८ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

--------

**(राहुल गुलाब जाधव)**
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

,

## <u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>

### <u>मा.महापालिका सभा</u>
### <u>कार्यपत्रिका क्रमांक – २४</u>
### <u>सभावृत्तांत</u>
### <u>(दि.२०/११/२०१८ व दि.२०/१२/२०१८ (दु.१.००) ची तहकूब सभा)</u>

<u>दिनांक – २०.१२.२०१८</u> <u>वेळ – सायं. ५.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/१२/२०१८ (दु.१.००) (माहे नोंव्हेबर-२०१८) ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दिनांक २०/१२/२०१८ रोजी सायं.५.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.राहुल गुलाब जाधव महापौर

२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव उपमहापौर

३) मा.दत्तात्रय बाबूराव साने

४) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

५) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

६) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

७) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

८) मा.सागर बाळासाहेब गवळी

९) मा.बारसे प्रियांका प्रविण

१०) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

११) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१२) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

,

१३) मा.फुगे भिमाबाई पोपट

१४) मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१५) मा.सावळे सिमा रविंद्र

१६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

१७) मा.गीता सुशिल मंचरकर

१८) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

१९) मा.केशव हनुमंत घोळवे

२०) मा.मंगला अशोक कदम

२१) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

२३) मा.भालेकर प्रविण महादेव

२४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

२५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

२६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

२७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

२८) मा.पवळे सुमनताई मधुकर

२९) मा.चिखले सचिन तुकाराम

३०) मा.जावेद रमजान शेख

३१) मा.यादव मीनल विशाल

३२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३३) मा.प्रमोद कुटे

३४) मा.बाबर शर्मिला राजू

३५) मा.अमित राजेंद्र गावडे

३६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

३७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

,

३८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४०) मा.ढाके नामदेव जनार्दन

४१) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४२) मा.करुणा शेखर चिंचवडे

४३) मा.भोईर सुरेश शिवाजी

४४) मा.अपर्णा निलेश डोके

४५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४६) मा.जयश्री वसंत गावडे

४७) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४८) मा.सुलक्षणा राजू धर

४९) मा.शाम गणपतराव लांडे

५०) मा.सुजाता सुनिल पालांडे

५१) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५२) मा.पाडाळे निता विलास

५३) मा.पवार मनिषा प्रमोद

५४) मा.अभिषेक गोविंद बारणे

५५) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

५६) मा.निलेश हिरामण बारणे

५७) मा.दर्शले रेखा राजेश

५८) मा.कलाटे राहुल तानाजी

५९) मा.कामठे तुषार गजानन

६०) मा.चोंधे आरती सुरेश

६१) मा.कस्पटे संदिप अरुण

६२) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

,

६३) मा.सुनिता हेमंत तापकीर

६४) मा.चंद्रकांत बारकु नखाते

६५) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

६६) मा.कुटे निर्मला संजय

६७) मा.आंगोळकर सागर सुनिल

६८) मा.मुंढे उषा अंकुश

६९) मा.लोखंडे चंदा राजू

७०) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

७१) मा.आशा धायगुडे-शेंडगे

७२) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

७३) मा.नवनाथ दत्तू जगताप

७४) मा.संतोष बबन कांबळे

७५) मा.सोनवणे शारदा हिरेन

७६) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

७७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

७८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

७९) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

८०) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर - आयुक्त, मा.पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे - प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे - मुख्यलेखा अधिकारी, मा.पाटील, मा.तुपे, मा.निकम, मा.सवणे - सहशहर अभियंता, मा.आष्टीकर, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे - सहा.आयुक्त, मा.लोणकर, मा.राऊत, मा.दांगट, मा.खोत - प्र.सहा.आयुक्त, मा.मुंढे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.शिंदे - प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग ),

,

मा.लडकत, मा.गलबले, मा.ओंभासे, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.पवार - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.आगळे - प्रशासन अधिकारी, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी, मा.माने-पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा. मंगला कदम-** मा. महापौर साहेब, तुम्ही काय म्हणलात. मिटींग तहकूब केली. विषय क्रमांक ६ ला नंतर बोलून देतो. विषय क्रमांक ६ वर बोलू दयाना सदस्यांना. विषय क्रमांक ६ वर आमचा विरोध नोंदवून घ्या.

[सभागृहामध्ये गोंधळ]

**मा.आशा धायगुडे-शेंडगे –** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा. सभागृह या विषयामध्ये आपल्या सगळयांना माहिती आहे की मधल्या काळामध्ये शहरामध्ये गरज नसताना आपण एचबीओटीची मशीन घेतली. वायसीएमला त्या मशीनची अजिबात गरज नव्हती. अशी मशीन घेण्याचा आपण घाट घातला, आपण घातला म्हणजे त्यावेळेसच्या सत्ताधा-यांनी घेतला. सन्मा. महापौर साहेब त्या एचबीओटी मशीनच या शहराला गरज होती/नव्हती. तत्कालीन लोकांना वाटले की आपण एचबीओटी मशीन वायसीएमसाठी घ्यायची. त्यांनी ती ७० लाखाची मशीन तब्बल ३ कोटीला घेतली त्यातून फायदा कोणाचा झाला. ख-या अर्थाने ज्यावेळेस ती मशीन घेतली नंतर ती इनस्टॉल केली गेली. त्यानंतर ती मशीन कितपत चालली. याची सुध्दा शहानिशा सन्मा. आयुक्त साहेब आपण करणे गरजेचे होते. नगरसदस्यांनी सुध्दा लक्षात घेतले पाहिजे. महापौर साहेब, ही एचबीओटीची मशीन घेतल्यानंतर.......

[सभागृहामध्ये गोंधळ]

**मा.आशा धायगुडे-शेंडगे-** सन्मा. महापौर साहेब, ज्या पध्दतीने या शहरामध्ये तत्कालीन सत्ताधा-यांनी ज्यापध्दतीने एचबीओटी मशीन घेतली आणि त्या मशीनच काय झाल. शहराचे तीन कोटी रुपये करदात्या नागरीकांचे आपण पाण्यात घालण्याचे काम त्यावेळेला करण्यात

,

आलं. ते तत्कालीन सत्ताधा-यांनी केलं. आता केलं, झाल त्याची शिक्षा नागरीकांना पण दिली. कारण फक्त नागरीकांचे पैसे उधळण्याचे काम त्यावेळेला करण्यात आलं होतं. सन्मा. महापौर साहेब आमचे सहकारी नगरसेवक विलास मडिगेरी यांच्या सौभाग्यवती वर्षाताई मडिगेरी त्यावेळेस सभागृहामध्ये होत्या त्यांनी अनेक वेळा त्या विषयाचा खूप चांगल्या प्रकारे पाठपुरावा केला. ते याच्यावर नक्की बोलतीलच परंतु तत्पूर्वी आता त्या एचबीओटी मशीनची सद्यस्थितीतील अवस्था काय आहे. याचा खुलासा जर आम्हांला केला तर चांगल होईल. सन्मा. महापौर साहेब अत्यंत महत्वाचा विषय आहे. एचबीओटीला आपण तीन कोटी रुपये मोजलेत. ती मशिन ज्या कोणी कॉन्ट्रॅक्टरानी पुरवली असेल त्याला आपण काय शिक्षा दिली. त्या मशीनवर आपण ५० लोकांना सुध्दा तपासले नाही. ५० लोकांना सुध्दा बेनिफीट झाला नाही. ३ कोटी रुपये आपण कसे वाया घालू शकतो. त्याचा आम्हाला खुलासा दया मला पुन्हा बोलायचे आहे.

**मा.संदीप वाघेरे-** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.सभागृह आता ही एचबीओटी मशीन जी पावणेतीन कोटी रुपयाला तत्कालीन सत्ताधा-यांच्या काळामध्ये घेतली. ती ऍक्च्यूअली ४७ लाखाची मशीन. त्यावेळेला डॉक्टर कनोज होते किंवा आणखी कोण होते. ते उपरवासी झाले. आता या मशीनला आपण सात लाख रुपये खर्च करणार आणि ती मेंटेनन्ससाठी तज्ञ माणसांना चालवायला देणार. कारण की तज्ञ माणूस आपल्याला आजपर्यंत भेटत नव्हता आता सहा वर्षांनी साक्षात्कार झाला. आयुक्त साहेब २०१२ ला ठराव मंजुर झाला. २०१३ ला ती मशीन घेतली. १५ दिवसांनी ती मशीन बंद पडली. ऍक्च्यूअली त्या मशीनच काय आपल्याकडे बर्न पेशंट जर आला तर त्याला ऑक्सीजन देवून चांगले वाटावे आणि लवकरात लवकर तो रिकव्हर व्हावा. यासाठी त्या मशीनचा उपयोग होता आणि ती मशीन त्याच्यासाठी घेतली होती. आज पावणेतीन कोटी रुपये आपल्या महापालिकेने खर्च केले. माझे हे म्हणणे नाही की सात लाख रुपये खर्च करा आणि त्या मशीनला यूजमध्ये आणा. पण ही मशीन ज्या ठेकेदाराकडून घेतली होती. आज ४७ लाखाची मशीन, ५० लाखाची मशीन जर आपण पावणेतीन कोटी रुपयाला घेतली. सव्वादोन कोटी रुपयाची आपली फसवणूक केली आणि त्या मशीनचे स्पेअरपार्ट म्हणजे इंडीयन मेड मशीन आहे ती आणि त्याचे स्पेअरपार्ट चायना मेड आहेत. आणि आपल्याला इथं सभागृहात सांगण्यात आले होते की ती जपान वरुन किंवा जर्मनीवरुन मागविलेली मशीन आहे. आज मला सांगा आयुक्तसाहेब तुम्ही आता इथ काल-परवा आदेश केला की डॉ. साळवे पवन आणि डॉ. रॉय

,

यांच्यामध्ये इथं डॉ. पंडीतसर आणले. आम्ही त्यांची माहिती काढली की ते बीजे मेडीकल कॉलेजमध्ये पण होते. तुम्ही चांगला निर्णय घेतला. कारण या दोन माणसांच्या भांडणामध्ये त्या वायसीएमचे खरच वाटोळे झालेले आहे. आता फक्त डॉ. पंडीत आणि डॉ. देशमुख यांचे तिथे वाद आहेत. डॉ. देशमुखनी तीथ लॉक लावून डॉ. पंडीता विरुध्द आंदोलन केलं होतं. म्हणजे कालचा गोंधळ तो गोंधळ होता आणि आज परत तिथे नवीन गोंधळ चालू होईल. त्याच्यासाठी तुम्हाला काही तरी उपाययोजना कराव्या लागतील. दुसरी गोष्ट अशी की रामकृष्ण मोरे सरांनी  १९८९ ला २५० बेडचे हॉस्पिटल त्यावेळी त्यांना विरोध झाला. आणि आज ते ७५० बेडचे हॉस्पिटल झाले. आता तिथे ३६६ नर्सेस आलेल्या आहेत आता तीथ आपल्याकडे १०१ नर्स कमी आहेत त्यातल्या ३१ ते ३२ लोकांनी कोर्टात केसेस केल्या नर्सेस भरण्यासाठी. १०१ नर्सेस आपण सिलेक्ट करुन आपण सुविधा देणार होतो. आज तिथे वायसीएममध्ये प्रत्येकाची दुकानदारी चालू आहे. डॉ. रॉय असेल, डॉ. साळवे असेल किंवा अजून कोणीही असतील. आज अशी परिस्थिती आहे आयुक्त साहेब तिथे की प्रत्येक माणूस तिथे टेंडर कसं भेटतय. कोणाला भेटतय आणि कुठल्या टेंडरमधून मला कसे पैसे भेटतील. आणि जी औषधे लागत नाहीत ती भरमसाठ मागवायची आणि जी लागतात त्याचा तुटवडा करायचा. तिथे महासंघाच्या वतीने जेनरीक मेडीकल चालू आहे. तिथला कुठलाही डॉक्टर जेनरीक मेडीकलमधले औषध लिहून देत नाही. ते ७० टक्के बिलोमध्ये जेनरीकचे औषध दयायला तयार आहेत. आज पंतप्रधान मोदीसाहेबांनी ती योजना चालू केली. जेनरीक मेडीकलची ज्यांची ऐपत नाही त्या माणसाला त्या मेडीकलमधून औषधे घेता येईल. परंतु आपले डॉक्टर सजेशस्टच करीत नाहीत त्या रुग्णाला. आज तिथे जे पेशंट आहेत त्या पेशंटचे नातेवाईक राहण्यासाठी किंवा तिथे झोपण्यासाठी पण सुविधा नाहीत. आज तिथे मशिनरी, व्हेंटीलेटर ओपीडी बघितली तिथली ५० बेडची आहे. पण ५० बेडमध्ये एकच व्हेंटीलेटर आहे. आणि जे आयसीयूज आपले आहेत आता आपल्याला तिथे २५ व्हेंटीलेटर पाहिजेत. आता तेथे फक्त १२ ते १३ व्हेंटीलेटर चालू आहेत. आणि १२ ते १५ बंद आहेत. आज गोडावूनमध्ये जाऊन बघीतलना साहेब तर करोडो रुपयांच्या मशिनरी बंद पडलेल्या आहेत. हे कोणाची नाचक्की आहे. आज महापालिकेनी करोडो रुपये खर्च करुन हे वायसीएम चालू केले आज आपण आणखी चार ठिकाणी हॉस्पिटल्स करतोय. पण आपण आपल्या लोकांना सुविधा देऊ शकत नाही. आणि आयुक्तसाहेब सगळयात महत्वाचा एक मुद्दा असा आहे. की आपण वायसीएममध्ये रुबी केअर सेंटर चालू केलेले आहे. हे कोणी दिले कसे दिले.

,

हयाची जरा शहानिशा करा. रुबी केअर सेंटर म्हणजे वायसीएम ही महापालिकेच्या भूमि जिंदगी विभागाशी संबंधित आहे. भूमि जिंदगी विभाग ठरविणार काय करायच ते. किंवा महापालिकेची कुठलीही मिळकत ही भूमि जिंदगीच्या अखत्यारीमध्ये येते. वायसीएममध्ये रुबी केअर चालू केले. आज आपले महापालिकेचे ८ ते ९ हजार कर्मचारी आहेत. तिथे गेल्यानंतर त्यांना सवलत पण भेटत नाही. आज आपण धन्वंतरीचे तीन-तीन कोटी रुपये बील देतोय. म्हणजे आपण ते रुबी केअर आपण आपल्या पैशावरती पोसतोय हे कुठेतरी थांबले पाहिजे आयुक्त साहेब. तुम्ही स्वत: जातीने लक्ष घाला तुमची सर्वस्वी कमांड पाहीजे. आज हे डॉक्टर लोक आपआपल्यात भांडतात स्वत:च्या स्वार्थासाठी तर हे तुम्ही पर्सनली लक्ष घालून हा नागरीकांच्या आरोग्याशी निगडित विषय आहे. स्वाईन फ्ल्यूचे पेशंट असतील, डेंगूचे पेशंट असतील हे कुठ थांबलतर चांगल होईल आणि लोकांना आरोग्याच्या सुविधा चांगल्या दया एवढ बोलून थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा. पंकज भालेकर**- मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा.सभागृह. मला या विषयाला अनुसरुन माझ्या प्रभागातील वैदयकीय संदर्भातील एक विषय याठिकाणी मांडायचा आहे. गेली चार महिन्यापासून आयुक्त साहेब मी तुम्हाला पत्र दिले आहे. माझ्या रुपीनगरमधील जी ओपीडी आहे तीथ गेले ब-याच वर्षापासून लॅब टेक्निशियन नियुक्त आहे. आता तिथे चार महिन्यापासून लॅब टेक्नीशयन नाही. तर माझ्या रुपीनगरच्या दवाखान्यामधील नागरीकांना त्रास होतो, गेली बरेच दिवस त्यांना निगडीच्या दवाखान्यामध्ये जायला लागते. त्याठिकाणी लॅब टेक्नीशियनची नियुक्ती नाही केलेली. मी रॉय सरांना जाऊन भेटलो त्यांनी सांगितलं त्या ठिकाणी लॅब टेक्नीशियनचे पद मंजुर नाही. ठिक आहे ते मंजुर नसेल तर यापूर्वी शासनाने त्याठिकाणी नियुक्त केलेली होती शासनानी त्याठिकाणी त्या पदावर बंदी आलेली आहे त्याठिकाणी कोणीही लॅब टेक्नीशयन नियुक्त करत नाही. पण मला सांगा मी गेले बरेच दिवसांपासून आपल्याकडे पाठपुरावा करतोय. आयुक्त साहेब, मी तुम्हाला दोन-तीन वेळा रिमांयडर पण केले होते. तरी त्याठिकाणी लॅब टेक्नीशियनची त्वरीत मला नेमणूक करुन दयावी. अशी माझी विनंती आहे महापौर साहेब डॉ. रॉय सरांना याचा खुलासा करायला सांगा.

**मा.डॉ.अनिल रॉय -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्तसाहेब, मा. सभागृह २०१५ पासून एचबीओटी मशीन बंद आहे. ती बंद झाल्यानंतर आपण त्याची निविदा काढली ती काढल्यानंतर ज्या व्यक्तीनी ती निवीदा भरली ती त्यावेळेस ७,७०,५००/- प्रथम दर्शविले

,

होते. ते आपण ऍक्सेप्ट करुन त्यांना आपण पत्र दिले एफडीआर भरा म्हणून त्यांनी आठ दहा महीने एफडीआर हे भरलेच नाही. सदर विषय स्टँडीगमधून सिल होवून मिळायला ऊशिर झाला, दरम्यान त्यांनी लेखी पत्र दिलं की आता हे काम करु शकणर नाही. यापूर्वी देखील आपण मा.जाधव साहेब आयुक्त असताना हे प्रपोजल पुटअप केल होतं. हे मशीन आपण बाहेर चालवायला देवू. दुसर कोणी मशिन रिपेअर करु शकतो का हे आपण पाहील. त्यामुळे असं प्रपोजल आलं की आम्ही मशीन चालऊ. आपण त्यांना विचारल की आपण मशीन्स चालवणार असालतर आपल्या काय कंडीशन्स असतील. त्यांनी कंडीशन फक्त एवढी सांगितली की आम्ही रेंट देणार नाही तथापि रेव्हेन्यू शेअरींग बेसीसवर करायला तयार आहे. सध्यस्थितीत पिंपरी चिंचवडमध्ये हे मशीन कुठल्याही हॉस्पिटलमध्ये ऊपलब्ध नाही. आपल्याकडे दोन पार्टीने भाग घेतला होता. त्यापैकी ऍडवीन सिस्टीम्स, नवी दिल्ली येथील ते लोक आर्मी डॉक्टर्स आहेत. त्यांचे अनेक ठिकाणी असे इन्स्टॉलेशन आहेत. सध्यस्थितीत मुंबई मेट्रोमध्ये त्यांच काम चालू आहे. दुसरी पार्टी जी आहे ती कास्को म्हणून आपले सप्लायर आहेत त्यांची मॅन्यूफॅक्चरींग कंपनी आहे त्यांना त्याच्यातला अनुभव आहे. त्यानंतर आम्ही आरएफपी तयार केला त्यामध्ये अशा अटी व शर्ती घातल्या की पहीले तीन वर्षे त्यांना काही दयायची गरज नाही. नंतर चौथ्या आणि पाचव्या वर्षाला ५ टक्के त्यांच शेअरींग असणार, सहाव्या आणि सातव्या वर्षाला १० टक्के शेअरींग असणार, आणि आठव्या, नवव्या वर्षी १५ टक्के नंतर २० टक्के, दरम्यानच्या काळामध्ये पुर्ण स्टाफ त्यांचा असणार. मशीन आता बंद असली तरी त्यांनी ती रिपेअर करुन घ्यायची आहे. २०१२ मध्ये घेतलं होत ते मशीन. तेव्हा वैदयकीय विभागाने स्वत: प्रपोजल पुटअप करुन ते मशीन खरेदी केलं होतं. आपल्याकडे तसं क्वॉलीफाईड यामध्ये ट्रेंड डॉक्टर्स नाहीत. तेवढा स्टाफ पण नाहीय. आणि तसं फक्त वायसीएमच्या पेशंटवर चालवायला तस परवडणार पण नाही.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे-** सन्मा. महापौर साहेब, आम्हाला पण खुलासा हवा आहे. आम्हाला सांगितलं पाहिजे आमहाला खुलासा मिळाला पाहिजे ना साहेब. ज्या माणसाकडे त्या पदाचा अधिकार आहे त्यांनी आम्हाला माहिती दयावी. ज्यांच्याकडे अधिकार आहेत त्यांनी खुलासा दयायचा आम्हाला. जीबीला हा विषय आहे ना महापौर साहेब मग त्यांच्याकडे माहिती का नाही. त्यांनीच माहिती दयावी आम्हाला.

**मा. महापौर-** डॉ. पंडीत एचबीओटीचा खुलासा करा.

,

**मा.डॉ.पद्माकर पंडीत (अधिष्ठाता, वायसीएमएच)** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा. सभागृह. मी डॉ.पद्माकर पंडीत. मी एमडी केले आहे. साडेछत्तीस वर्षे शासकीय वैदयकीय महाविदयालय आणि ससूण रुग्णालयामध्ये सेवा केली आहे. २०१६ मध्ये महापालिकेच्या मागणीवरुन शासनाने मला पदव्युत्तर संस्था स्थापन करण्याकरीता पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयामध्ये प्रतिनियुक्त केले. तेव्हापासून मी गेली पंचवीस महिने महापालिकेच्या सेवेत आहे. अगोदर मी प्राध्यापक आणि विशेष कार्य अधिकारी होतो. आणि दोन महीन्यापूर्वी माझ्याकडे अधिष्ठाता पदाचा कार्यभार देण्यात आला आहे आणि आठ दिवसापूर्वी मला अधिष्ठाता पदाचे अधिकार देण्यात आले.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे-** सन्मा. महापौर साहेब, अनेक गोष्टी आमच्या माघारी घडतात आणि आम्हाला काहीच त्याचा पत्ता नसतो. आम्हाला त्याचा खुलासा मिळाला पाहिजे.

**मा.आयुक्त -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा. सभागृह आता विषय क्रमांक ७ च्या संदर्भात मी सविस्तर खुलासा करु इच्छितो. डॉ. अनिल रॉय यांच्याकडे एमओएच पदाचा आणि संपुर्ण वैदयकीय पदाचा पदभार असल्यापासून ते हा विषय हाताळत असल्याने त्यांनाच आताच हे सादरीकरण करणेसाठी त्यांच्याकडेच हा विषय ठेवलेला आहे. त्यामुळे त्यांच्याकडून हे सादरीकरण झालेले आहे. डॉ. पंडीत यांनी आता आपली ओळख करुन दिली आहे. ते आपल्याकडे २०१६ सालापासून शासकीय प्रतिनियुक्तीवरती महानगरपालिकेकडे पदव्युत्तर संस्था स्थापन करण्यासाठी आपल्याकडे प्रतिनियुक्त केलेले आहेत. तेव्हापासून दोन वर्षे आपल्याकडे वायसीएम येथे पीजीआय स्थापनेसाठी ते आपल्याकडे कार्यरत आहेत. पीजीआयची आपल्या इथं ऑगस्ट २०१८ मध्ये एमसीआय यांच्या वतीन तपासणी करणेत आली. तपासणी केल्यानंतर पीजीआय इन्स्टीटयूट स्थापन होण्यासाठी जी महत्वाची त्रुटी एमसीआयकडून काढणेत आली. त्याच्यामध्ये आपल्या पीजीआयला डीन कायमस्वरुपी नियुक्त नसणे ही सर्वात प्राथमिक त्रुटी त्याच्यामध्ये होती. ही त्रुटी दूर करायच्या अनुषंगाने मला सभागृहाला हे नमुद करावयाचे आहे की आता आपल्या इथं जी वायसीएममध्ये तज्ञ डॉक्टरांची कमतरता असते ती भरुन काढण्यासाठी आपल्या इथं पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटीटयूट स्थापन करण्याचा निर्णय २०१४ मध्ये या सभागृहामध्ये घेण्यात आलेला आहे. त्याची कार्यवाही आपण करीत आहोत ती कार्यवाही होत असताना आपल्याइथं तज्ञ डॉक्टर्स आणि तज्ञ विदयार्थी आपल्याकडे पोस्ट ग्रॅज्यूएट शिकत आहेत ते आपल्याकडे २४ तास उपलब्ध होतील हया हेतूने आपण पीजी इन्स्टीटयूट स्थापन केली. त्याच्यासाठी भरती प्रक्रिया आपण

,

कंत्राटी तत्वावरती गेल्या दोन वर्षापासून आपण करतो आहोत आणि सुमारे ४७ ते ४८ डॉक्टर्स आपल्याकडे आता उपलब्ध झालेले आहेत. मात्र अंतिमतः पीजीआय आपल्याकडे स्थापन होणेसाठी आपल्याला डीनची नियुक्ती करणे आवश्यक आहे. या पदाची भरती प्रक्रिया देखील आपण पूर्ण केलेली आहे. पण सध्याच्या कालावधीमध्ये पीजीआय जोपर्यंत अंतिमतः मंजूर होत नाही तोपर्यंत आपण ही कंत्राटी तत्वावर भरती करत आहोत. ती परमनंट भरती आपण करु शकत नाही. आणि म्हणूनच आता आपण कंत्राटी तत्वावरती डीनची भरती केलेली आहे मात्र ते रुजू होण्यासाठी अदयाप तीन महिन्याचा कालावधी शिल्लक आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये पीजीआय आपल्याला मंजुर व्हावे याकरीता त्या पदाचा कार्यभार देण्यासाठी आपल्याकडे उपलब्ध असलेल्या आणि क्वॉलिफाईड असलेल्या डॉक्टर्स मधून त्यांची नियुक्ती करणे आपल्याला आवश्यक असल्याने शासकीय प्रतिनियुक्तीवरती आपल्याकडे कार्यरत असलेले, ३८ वर्षाचा अनुभव असलेले प्राध्यापक असलेले डॉ. पंडीत यांना आपण डीन या पदाचा पदभार दिलेला आहे. एमसीआयच्या गाईडलाईन्स सुध्दा डीनची काय कर्तव्ये असावीत. याच्या अनुषंगाने आपण कार्यविवरण देखील गेल्या आठवडयामध्ये त्याचे आदेश निर्गमीत केलेले आहेत. याच्या अनुषंगाने आपल्या इथें संपुर्ण वायसीएम दवाखाना हा डॉ. पवन साळवे यांच्या ओव्हरऑल सुपरव्हिजीन खालीच ठेवणेत आलेला आहे. मात्र वायसीएममधील प्रशासकीय कारभार आता यापुढे डीन यांच्यामार्फत केला जाणार आहे. त्याकरिता एमएस, विभागप्रमुख हे आपल्याकडे विवीध विभाग आपण स्थापन करीत आहोत ते विभाग प्रमुख यांच्या माध्यमातून तांत्रिक स्वरुपाची रचना देखील करणेत येत आहे. ही प्रक्रिया होत असताना डॉक्टर पंडीत यांना आता आपण तात्पुरता पदभार दिलेला आहे. मात्र एचबीओटीचा विषय पहिल्यापासून डॉक्टर रॉय हातळत असल्याने त्यांनाच आतापर्यंत हा विषय हाताळण्याचे अधिकार माझ्याकडन देण्यात आलेले आहेत आणि त्याच अधिकारान त्यांनी या विषयाचे सादरीकरण केलेले आहे. भविष्यामध्ये याचा सविस्तर कार्यपदभार डॉक्टर पंडीत यांच्याकडे देऊन त्यांच्यामार्फत त्याच सविस्तर हॅण्डलींग करणेत येणार आहे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्तसाहेब, मा. सभागृह. आताच आयुक्त साहेबांनी सांगीतलेल आहे की मी डॉ. पंडीत यांना चार्ज दिला. तुम्ही त्यांच्याकडे चार्ज दिला. मला वाटतं की डीन या पदाकड आपण असा चार्ज देऊ शकतो का. वायसीएमचा एमओएच हे अत्यंत जबाबदारीचे पद आहे, मा.महापौर साहेब, आज आपण मगापासून सभागृहामध्ये ओरडतोय की आमच्या पीएमपीएमएलवर अन्याय होतोय. आमच्या अधिका-यावरती अन्याय

,

होतो. इथं काय चाललय आपल्याच चावडीखाली. हे सुध्दा आपण बघण गरजेच नाही का. इथं यायच इथ फक्त आपण भुषणगिरी करायची आणि तिकड जाऊन पीएमपीएमएल आपल्याकडे नाही त्याच्या वरती बोलायचं. परंतु या सभागृहामध्ये काय घडतय, आपल्या मागे काय घडत याची सुध्दा आपल्याला कल्पना नकोय का. आज तुम्ही वायसीएमचा एमओएच बदलून आमचा तमाशा केलात. दोघांच्याकडे चार्ज ठेवलेत. मागच्या वर्षी डॉ. रॉय आणि डॉ. साळवे हे दोन एमओएच एकाच विभागासाठी असू शकतात का याचा खुलासा आता आपण याठिकाणी दयायचा. आम्ही काही गोष्टी डोळयाआड करतो, की चला हरकत नाही काही गोष्टी चांगल्या होणार असतीलतर, शिस्त लागणार असेलतर आपण सुध्दा काही गोष्टीकड दुर्लक्ष केलं पाहीजे म्हणून आम्ही गप्प बसतो याचा अर्थ म्हणजे त्यांची जबाबदारी काय आहे पीजीआय इन्स्टीटयूट स्थापन करणे. त्यांच्याकडून घोर चुका झालेल्या आहेत या महानगरपालिकेच्या कामामध्ये ती त्याच्याकडे आपण एवढा मोठा पदभार कसा देऊ शकता. आज एमओएचसारखं जबाबदार पद आहे. इथे आम्ही १३३ नगरसेवक आहोत, इथे आम्ही निवडून आलेलो आहोत, आम्ही हजारो नागरीकांच प्रतिनिधीत्व करण्यासाठी सभागृहात येतो. आज आमचा एक एक पेशंट आमच्या येथील डॉक्टर्सना माहीत असतो मग आता आम्ही त्यांच्यासाठी डीनशी बोलायचे का. सन्मा. आयुक्त साहेब आपण ज्या पध्दतीने इथं वागताय. तुम्ही याठिकाणी खुलासा दयायचा. सन्मा. महापौर साहेब तुम्हाला मी याठिकाणी सांगू इच्छिते की बीपीएमसी ॲक्टमध्ये एमओएचचे पद आहे, परंतु डीनचे पद हे बीपीएमसी अक्टमध्ये नाही. मग एका डीनला आपण अशा प्रकारचा चार्ज देऊन माझ्या शहरातील हजारो नागरीकांच्या जिवाशी खेळत नाही आहोत का. माझ्या शहरातील नागरीकांच्या जिवावरती ही महानगरपालिका चालते. तुमच्या माझ्या आयुक्तांच्या जिवावरती चालत नाही. याचा विसर सन्मा. आयुक्तांना पडलेला आहे असं मला याठिकाणी नमुद करावस वाटतं. सन्मा. महापौर साहेब आपण एमओएच पदाबाबत तुम्ही आम्हाला खुलासा करा, आमच अज्ञान असेल की डीन आणि एमओएच पद या दोन पदांना बीपीएमसी अक्टमध्ये डीनच्या पदाला आपल्याकडे परमिशन आहे का. सन्मा महापौर साहेब मी आणखी सांगू इच्छिते की ४५ अनुसार एमओएचचे पद हे संविधानीक पद आहे. ते फक्त सिटी इंजिनिअर लेखाधिकारी माझ्या मते फक्त चार लोकांनाच हे पद बीपीएमसी ॲक्टमध्ये तरतूद आहे. परंतु हे जे डीन म्हणून आपल्याकडे डॉ. पंडीत आलेत ते आपल्याकडे पीजीआय इन्स्टीटयूट स्थापन करण्यासाठी आले. २०१७ मध्ये त्यांनी याठिकाणी शासनाकडे २० लाख रुपये भरणे अपेक्षित होते. त्यांची

,

नजरचूक म्हणजे त्यांचा हेतू काय होता ते आम्हाला कळला नाही. आपण सांगतोय की आपण कॉलेज चालू करतोय वगैरे. कॉलेजमध्ये एमबीबीएसच शिक्षण आणि पीजीच शिक्षण एकत्रित मिळते. आज आपण इथे पीजीआय चालू करतोय. ते पीजीआय चालू करण्याची जबाबदारी डॉ. पंडीत यांच्यावर होती, त्याच्या इतक्या मोठया घोर चुका आहेत की त्यांनी त्यावेळेला २० लाख भरायचे होते तर २ लाख रुपये शासनाकड भरले नाहीतर २०१७ पासून आपल्या कामकाजास सुरुवात झाली असती. डॉक्टर भरतीला सुरवात झाली असती. तब्बल एक वर्षाचा कालखंड त्यांच्यामुळे माझ शहर मागं पडलं अशा अधिका-याला आपण एमओएचचा पदभार देतो ही कोणती पध्दत आहे. आम्ही काय इथे वेडे म्हणून आपल्याला दिसतो. सन्मा. महापौर साहेब आतासुध्दा दहा विषयांसाठी साहेब चुकीचे असेल तर आम्हाला लगेच सांगा. आता सुध्दा दहा विषयांसाठी मान्यता मिळाली, फक्त सात विषयाच्याच कामाची पुर्तता झालेली आहे. आज सुध्दा आपल्याकडून तीन विषयांची पुर्तता नाही. जे काम दिलयं त्या कामासाठी ते इथे आलेले आहेत. त्यांनी तेवढच काम बघण्याची जबाबदारीने केले पाहिजे. आपल्या महानगरपालिकेचे जे कामकाज चालतं त्याच्यामध्ये मला वाटते की १३३ नगरसेवकांचा विषय याठिकाणी अधिका-याशी असण्यापेक्षा सन्मा. आयुक्तसाहेब आम्हाला आमची कामे होणे. आमच्या महानगरपालिकेतील नागरीकांच्या काही अडचणी असतात. हे सोडविणे हे आमचे काम आहे. वैदयकीय अधिकारी म्हणून खरतर एकच पद असते. ती कशी काय कमिशनरसाहेबांनी दोन पदे दिली. कोणत्या अधिकाराने दिले त्यांनाच माहिती. आपण म्हणतो जाऊ देत नका हा विषय सभागृहामध्ये चर्चेला आणायला म्हणून आम्ही टाळतो. त्याचा अर्थ असा नाही की आपण काहीही करायचं. पण कोणता अधिकार आहे ते त्यांनी आम्हाला सांगावं. त्याचबरोबर सन्मा. आयुक्तसाहेब आपण डीन पदासाठी आपल्याकडे इन्टरव्हीव घेतले होते बरोबर आहे. आणि त्याठिकाणी वाबळे नावाचे डॉक्टर यांचे आपण सिलेक्शन केले. आता ते आपल्याकडे न आल्यामुळे आपण डीनचा चार्ज देवून टाकला. आता आपण त्यांच्याकडे चार्ज दिला. मग आपण सेकंड माणसाला प्रेफरन्स का दिला नाही. वाबळे यांचे सिलेक्शन झाले होते. परंतु सिलेक्शनंतर तीन महिने त्यांनी तुमची वाट पाहिली इतक योग्य नाही, ज्यावेळेला आम्हांला वाटल की राहूलदादा महापौर व्हायला तयार नाहीतर तर दुसरा सेकंड व्यक्ती कोण आहे त्याला लगेच शोधल पाहीजे. परंतु ते येत नाहीत म्हणून तीन महीने आमच्या शहराचा विकास खुंटण्याच काही कारण नाही. आपण दोन नंबरच्या व्यक्तीला कॉल सुध्दा केला नाही. या एकएक टप्प्यानंतर आज अशी कंडीशन आहे की आपण

'

वायसीएम मध्ये २५० बेडचे असणार हॉस्पिटल आज ७५० बेडवर गेलंय. म्हणजे निश्चितपणे ही चांगली गोष्ट नाहीय एका अर्थाने विचार केलातर. पेशंटची संख्या वाढते त्याच्यामुळे बेड आपल्याला वाढवावयाला लागतात. परंतु लोकसंख्या देखील तितक्याच प्रमाणात वाढतेय. हे सुध्दा आपण लक्षात घेतले पाहिजे. पुन्हा आपल्याकडे लोकसंख्या वाढल्यामुळे बेड वाढविण्याची गरज लागली आणि आपण ती वाढविली सुध्दा. परंतु ती वाढवीत असताना आपण आजपर्यंत एमओएच म्हणून ज्यांच्याकडे जबाबदारी असायची ते पुर्णपणे वायसीएमचा कारभार बघण्याचे काम करायचे. परंतु आता डॉ. देशमुख यांना फक्त नर्सेस बघण्याचे काम. नर्सेस नियुक्ती कामकाजाचे वाटप असेल. वॉर्डन्स् असतील त्यांचे कामकाज वाटप इत्यादी त्यांच्याकडे दिले गेले आहे. साहेब एखादया माणसाची इतकी अवहेलना करणे, कारण त्यांनी सुध्दा आमच्या शहरासाठी काम केलेले आहे. हे आपण याठिकाणी नाकारुन चालणार नाही. मागच्यावेळेस नाव न घेता मी बोलले होते. डॉ. पंडीतांनी कशा प्रकारच्या शिव्या, शिव्या साहेब, डॉक्टर आहेत ते डीन म्हणून आता आपल्या महानगरपालिकेच्या वायसीएमएचची जबाबदारी ते आता पाहतात. म्हणून मी मगाशी नाव न घेता बोलले होते सभागृहामध्ये. की एखादया अधिका-याला शिव्या दयायच्या आणि तुम्ही त्यांना लेखी मागायच, आणि त्यांनी दिल सुध्दा त्याच्यावर तुम्ही काय केलं. तुमच्यावर दबाव येतो की काय. आमच्या महापौरांचा येतो का, पक्षाचा येतो का नगरसेवकांचा येतो. अशाप्रकारे तुमच्या सुध्दा चुकीच्या गोष्टी आम्ही सभागृह सहन करणार नाही. १३३ नगरसेवकांच्या माध्यमातून चालणारे वायसीएम आहे आणि वायसीएमची उभारणी आमच्या शहरातील करदात्यां नागरीकांच्या जीवावर आहे. आणि जर माझ्या नागरीकांचा जीव धोक्यात असेलतर अशा व्यक्तीकडन आम्ही सुध्दा याठिकाणी काम करुन घेणार नाहीत याची सुध्दा तुम्हांला जाणीव असली पाहीजे. सन्मा.महापौर साहेब, या एचबीओटी विषयावरती आणि डॉ. पंडीत या दोन्ही विषयावरती याठिकाणी खुलासा मिळावा. एचबीओटी मशीनला आमचा अजीबात विरोध नाही. परंतु त्याची रुबी हेल्थ केअर सारखी अवस्था होवू नये. ते मशीन रिपेअरींग केल, एक्स वाय झेडला तुम्ही काम दिलं, आजीबात फार मोठी अमौंट आहे असे वाटत नाही. पाच सात वर्षापुर्वी आपण तीन कोट रु. घालून बसलोच आहोत त्याच्या व्याजात सुध्दा आपण एचबीओटी मशीन आणु शकलो असतो. परंतु आता फार चर्चा करण्यात मजा नाही. परंतु त्याच्यामध्ये सुध्दा आपल्या शहरातील नागरीकांना ते कस फुकट करता येईल किंवा कमी पैशात देता येईल त्याचा विचार सुध्दा करण आवश्यक आहे. तरी आयुक्त साहेब त्यामध्ये

,

असे घ्या की शहरातील नागरीकांना मोफत आणि बाहेरुन लोक मशीनसाठी येतील शहरा बाहेरच्या लोकांकडून काय चार्जेस घ्यायचे आहेत ते घ्या. परंतु या शहरातील नागरीकांना मोफत उपचार दयावेत अशी याठिकाणी उपसूचना करते आणि सन्मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपण डॉ.पंडीत सरांना जो चार्ज दिला आहे त्याच्यावरती विचार करावा लागेल नाहीतर मला सुध्दा माझ्या वैयक्तिक भूमीकेमध्ये पत्रव्यवहार करावा लागेल. एवढ बोलून थांबते, जयहिन्द जय महाराष्ट्र.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खर म्हणजे वायसीएम हॉस्पिटलमधील एचबीओटी मशीनच्या संदर्भात आजच्या या सभेमध्ये गेल्या पाच-सात वर्षापुर्वी ही मशीन तीन कोटी रुपयाला खरेदी केली त्याच्यानंतर ही मशीन धुळखात पडलेल आहे. या मशीनच्या मेन्टेनन्ससाठी हा विषय येथे आलेला आहे. मा.महापौर साहेब, खरे म्हणजे एचबीओटी मशीनचा विषय असताना गेल्या दोन वर्षापासून वायसीएम हॉस्पिटलमध्ये ज्या ज्या वेळेला आम्ही जातो त्यावेळेला हॉस्पिटलमध्ये असणा-या डॉक्टरांची संख्या, त्या ठिकाणी असलेल्या रुग्णांची अवस्था आणि सातत्यान डॉक्टरांची कमतरता ही गेल्या दोन वर्षापासून आम्ही या वायसीएम हॉस्पिटलमध्ये बघतो. याठिकाणी कोण व्यक्ती आहे, कोण अधिष्ठाता आहे, कोण डीन आहे त्याच्याशी आम्हांला देणंघेणं नाही. गेल्या दिड दोन वर्षापासून या वायसीएम हॉस्पिटलची सुधारणा व्हावी त्याठिकाणी डॉक्टर यावेत यासाठी या महानगरपालिकेच्या माध्यमातून या पीजी इन्स्टिटीटयूटची स्थापना करण्यासाठी आपण गेल्या दिड वर्षापासून प्रयत्नशील आहेत. हे पीजी इन्स्टिटीटयूट चालू करायच, आपण एखादया व्यक्तीला डोळयासमोर ठेवून आपण काही करतोय की काय अशा पध्दतीचा याठिकाणी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जातय. परंतु याठिकाणी आमची एक कळकळीची विनंती आहे की याठिकाणी डॉ. साळवे असतील, डॉ. अनिल रॉय असतील किंवा आता आपण ज्यांना नियुक्त केले आहे ते डॉ. पंडीत असतील आमची एकच तळमळ आहे व्यक्ती कोणीही असू दया परंतु गेल्या दिड दोन वर्षापासून या इन्स्टिटीटयूटची काय अवस्था आहे, डॉक्टरांची काय अवस्था आहे, वायसीएम हॉस्पिटलमध्ये कशामध्ये इन्ट्रेस्ट जास्त आहे हे गेल्या दिड दोन वर्षापासून आम्ही याठिकाणी बघतोय. आयुक्त साहेब आपण याठिकाणी डॉ. पंडीत यांना नियुक्त केल आहे. मला असं वाटत की गेल्या एक दिड वर्षापासून डॉ. रॉय असतील किंवा डॉ.साळवी असतील आताच नवीन डॉ.पंडीत यांची अधिष्ठाता या पदावर नियुक्ती केली. आपण त्यांना सहा महीन्याचा अवधी देवू यात. सहा महीन्याच्या कालावधीमध्ये त्यांनी जर का हा

,

वायसीएमचा कारभार याठिकाणी सुरळीत नाही केलातर ख-या अर्थान मला असं वाटत की व्यक्तीप्रेम करण्यापेक्षा हे वायसीएम हॉस्पिटल सुधराव, याठिकाणी पीजी इन्स्टिटयूट यावी आणि याठिकाणी डॉक्टर्स अधिक यावेत यासाठी आपण सगळेजण प्रयत्नशील राहूयात. जे काही झाल दिड दोन वर्षापासून आपण पुन्हा पुन्हा त्या चक्रामध्ये कुठेतरी पडण्यापेक्षा आपल्याला पिंपरी चिंचवडमध्ये असणा-या रुग्णांची ख-या अर्थाने जर सेवा करायची असेलतर या वायसीएम हॉस्पिटलमध्ये येणारी पीजी इन्स्टिटयूट आहे ती वाढण्याकरीता त्यासाठी आपण सगळयांनी याठिकाणी प्रयत्न केला पाहीजे अस मला वाटत. आणि म्हणून आयुक्त साहेब तुम्ही याठिकाणी डॉ. पंडीत यांची नेमणुक केली असेल तरी त्यांना टार्गेट दया आणि टार्गेट देत असताना चुकीच्या पध्दतीने काम करणारे अधिकारी जर याठिकाणी असतीलतर त्याठिकाणी डॉक्टर पंडीतांच्या माध्यमातून कारवाई करा आणि चुकीचे काम करणारे जे काही आपल्या स्वार्थापोटी किंवा व्यक्तीगत पोटी याठिकाणी काम करतात अशा अधिका-यांना किंवा आशा डॉक्टरांना घरी पाठवण्याच काम डॉ.पंडीतांच्या माध्यमातून करा.वायसीएम हॉस्पिटलची खंत खर म्हणजे पिंपरी चिंचवड शहरामध्ये असणा-या सर्वसामान्य नागरीकांना आहे. आमच्याकडे ज्यावेळेला रुग्ण येतात त्यावेळेला सांगतात की तीथ गेल्याच्यानंतर काय अवस्था आहे ती, तेथील टॉयलेट कसं असतं, डॉक्टर काय ट्रिटमेंट करतात आणि कशा पध्दतीने केल जातं. हे असे अनेक विषय याठिकाणी बोलण्यासारखे आहेत परंतु आजचा विषय फक्त एचबीओटीचा आहे. हे तीन कोटी रुपयाच मशीन आपण याठिकाणी पडून ठेवलेलं आहे. हे मशीन किती रुग्णांना वापरल जाणार आहे, कशासाठी वापरल जाणार आहे याची आम्हांला नगरसेवकांना थोडी बहुत कमी अधिक माहिती असु शकते. परंतु तीन कोटीच मशीन स्क्रॅपमध्ये विकायच का, का ते रिपेअर करुन पुन्हा रुग्णासाठी वापरायचं हा विषय ख-या अर्थाने आजच्या विषयपत्रीकेवरती आलेला आहे. मी मा.महापौर साहेबांना विनंती करेल की हा जो एचबीओटीचा विषय आहे याच्यावरतीच ख-या अर्थाने चर्चा झाली पाहीजे आणि याच्यावरच सगळयांनी चर्चा करावी अशी मी विनंती करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज याठिकाणी एचबीओटी मशीन चालवायला देण्यासाठीचा विषय आलेला आहे. ऑपरेशन आणि मेन्टेनन्स करता एचबीओटीचा विषय आणलेला आहे. आमचे नामदेव ढाके नवीन आहेत, नामदेव दादा या विषयाचा पाठपुरावा विलास मडिगेरी यांच्या सौभाग्यवती वर्षाताई विलास मडिगेरी यांनी केला. विरोध त्यांनी केला होता. त्याचा पाठपुरावा जितके काही मुख्यमंत्री आहेत सगळयांना

,

त्यांनी केला, तो काही तत्कालीन सत्ताधा-यांनी केला नव्हता आणि मीही केला नाही. माझ्या सभागृहातील सहकारी म्हणून मी त्यांना सहकार्य केल. विरोध का केला होतातर मशिनची किमंत जास्त आहे असं आम्हांला कळाल नव्हतंतर ते कागदोपत्री सिध्द झाल होतं आणि म्हणून विरोध झाला. आपण उठलात, आपण बोललात, धाप,धाप,धाप,धाप काहीतरी बोललात, कोणाचा विरोध कशाला आहे, काय आहे याची माहिती घ्या मागचे सभावृत्तांत वाचा. मी जर मा.महापौरांना विंनती केली हात वर करुन मला बोलायला दोन मिनीट संधी दया त्याच कारण असं आहे की त्यावेळेस आम्ही विरोधी पक्षात होतो, वर्षाताई मडिगेरी याठिकाणी एकटयाच बोलायच्या आणि त्यांना सहकारी म्हणून मी त्यांना सपोर्ट करायची. माझ नैतीक कर्तव्य आहे, आज मी सत्तेत बसले म्हणून मी काहीही करेल का. नाही करणार, नाही चालणार असं. मा.महापौर साहेब, मशीन आणली, मशीन याठिकाणी आता आहे, घ्यायची नव्हती, घेतली. घ्यायला पाहीजे होती, कुठे अशी सुविधा नाही. आपण घेतली तीला आता ऑपरेशन मेन्टेनन्स करता जी कुठली संस्था मागते त्यांना देण्याच्यासाठी याठिकाणी आपण विषय आणलेला आहे. एफआरपीसाठी विषय आणलेला आहे, दुसरा कशासाठी विषय आणलेला नाही. हे जरी खर असल की चालू केली पाहीजे का, केली पाहीजे. आशाताईनी आता सांगीतल की शहरातील नागरीकांकडून पैसे घेवू नयेत, बाहेरच्या नागरीकांकडन पैसे घ्या.  मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला वाटत डॉ. रॉय यांनी सांगीतल होतं की त्या मशीनमध्ये बसल्यानंतर त्या डॉक्टरांच जो कोण असेल ते उपचार करणारे त्या डॉक्टरांच वय सुध्दा वाढणार नाही इतकी चांगली मशीन. मशीन बद्दल आमचे आक्षेप नव्हते मशीनच्या मेक बद्दल ऑब्जेक्शन होतं. ते कोणी घेतले होते याचाही ऊहापोह झाला पाहीजेनां, का नाही झाला पाहीजे. उदया पत्रकारांनी छापू देत की सत्ताधारी वर्षा विलास मडिगेरी यांची भूमीका इथे बदलली, चालणार आहे का आम्हांला, नाही चालणार, माझ्या पक्षाचे आहेत नां, मी कसं खपवून घेणार. आणि म्हणून मा.महापौर साहेब, याठिकाणी माझ म्हणणं मांडण योग्य आहे. मशीन चांगली असेल, गेल्या अनेक दिवसामध्ये आपण तीन वर्षामध्ये त्यांना काय शिक्षा दयायची ती दिलेली आहे. आता आपण हा विषय मशीन चालू करण्याकरिता आणतो डॉ. रॉय आपण सांगीतल की, म्हणजे मला जोपर्यंत आठवतं त्या सगळया मशीनची देखभाल, दुरुस्ती, चालवण्याची जबाबदारी मनालीवाल्यांची आहे आपली नव्हती. तशी माझी मेमरी ब-यापैकी स्ट्राँग आहे मला चांगल आठवत आहे. आणि म्हणून त्यांनीच ती जबाबदारी घ्यावी या मताची मी होते. परंतु गेल्या तीन चार वर्षात जे काही या सभागृहामध्ये घडलं त्यानंतर

,

आताजर आपण काही नवीन पाऊल उचलणार असूतर, आता आपल्याला ठेकदाराकडून पैसेतर परत घेता येणार नाहीत. मशीन कोणी घ्यायला लावली होती, कशी घ्यायला लावली होती हे सर्वश्रूत आहे, सगळयांना माहीती आहे काय झाल ते. त्यावेळेसच्या तत्कालीन सत्ताधा-यांचा तो विषय होता. त्यांनी विषय त्यांच्या स्वार्थापोटी केला असता का असं आजतरी मी म्हणू शकत नाही परंतु ऑब्जेक्शन मात्र निश्चितपणे रक्कमेवर होतं आणि मेकवरती. आम्हांला सांगीतल होतं की विदेशातन मशीन येणार आहे. आणि मग नंतर काय झाल आपल्या एमआयडीसीमध्ये त्याचे पार्ट तयार केले आणि टप्याटप्यानी ते वायसीएममध्ये आले. अशा खुप रंजक कहाण्या त्याच्यामध्ये आहेत, त्या कहाण्या पण तुम्ही सोडून दया. त्या कहाण्याच्या बरोबर आज याची जबाबदारी निश्चितपणे महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून आपली आहे. त्याच बरोबर मा.महापौर साहेब, या सभागृहात या विषयाशी सूसंगत जर काही विषय असतील तर निश्चितपणे त्यावरती बोलण्याचा सुध्दा या सभागृहामध्ये निवडून आलो म्हणून आमचा अधिकार आहे. डॉ. पंडीतावरती चार महीन्यापुर्वी साहेब आपलीच भुमीका वेगळी आहे. आज तुम्ही भूमीका का बदलली मला माहिती नाही. आज तुम्हांला ते सक्षम वाटत असतीलतर तुमचे तुम्हांला लकलाभ. पण आमचे जे ते दोन अधिकारी आहेत डॉ.रॉय आणि डॉ.साळवी यांच्याकडे तुम्ही काय देणार आह्ते आणि असा एखादा नवीन पदभार जर देणार असाल एखादया मोठया पदावरती कोणाला देणार असालतर या सभागृहात मांडण्यात येईल पुन्हा, एवढी तर अपेक्षा आम्ही तुमच्याकडन बाळगतोनां, का नाही बाळगणार. आम्हांला कळाल पाहीजे की कोण कोणत्या पदावरती बसतं आणि का बसवल गेलं. एकीकडे तुम्हांला आठवत असेल मी चेअरमन असताना मी असच बोलले होते आपल पीजे इन्स्टिटीटयूट चालू होण्यासाठी की जिथे त्यांनी वीस लाख भरायचे होते तिथे दोन लाख भरले. आणि त्यांनी सांगीतल की माझ लक्षच नाही मेल आला मलातर. अशी जर जबाबदारीमध्ये त्यांनी कुचराई केली असेलतर त्यांना हे पद देताना किमान आम्हांला विश्वासात घ्या. आम्ही म्हणणार नाहीत आम्हांला विचारा. विचारलतर आम्ही शंभर टक्के सांगु, ते ऍक्सेप्टेबल नाहीत. या दोन अधिका-यांना काय देणार. यांनी काय काम करायचं का यांना असेच पगार दयायचे. यांना पळवानां साहेब, ईलीजीबल आहेत, चांगले आहेत काम करुन घ्या. महापालिकेत कोणी काय चांगल काम करतच नाही का, मग नसेलतर सगळे प्रतिनियुक्तीवर आणा इकडची आमच्या डाव्या बाजूची जी रांग आहेना ते सगळे प्रतिनियुक्तीवर आणा आमच काहीही म्हणण नाही. पण चांगल काम करत असतीलतर त्यांना चांगल्याची

,

शाबसकी दिलीच पाहीजे या मताची मी आहे. मला डॉ.रॉय आणि डॉ.साळवी यांची बाजू घ्यायची नाही. २००७ ला मी पहील्यांदा निवडून आले मलातर कळायचच नाही डॉ.साळवे कडन बोलायच का डॉ.रॉयकडून बोलायचं, डॉ.साळवे कडन बोलायच का डॉ.रॉयकडून बोलायचं. आणि एवढा तो पाठशिवणीचा खेळ आम्ही पाहीलेला आहे. परंतु त्यामध्ये सुध्दा जे काही चांगल होत त्या चांगल्या व्यक्तीच्या आम्ही पाठीशी राहीलो. दोन्ही माणस आहेत. तुम्हीच साहेब आता पाच सहा महीन्यापुर्वी डॉ.साळवीना पदभार दिला. आता त्यांचा पण काढला. तुम्ही तात्पुरता जरी दिला असेलतर किमान सांगाना साहेब. आम्ही त्या दोघाना फोन केलातर दोघही हात वर करतात, आम्हांला काही माहिती नाही, दोघही नॉनस्टॉप. आता यांच्यातर दोन लाख भरायचे का वीस लाख भरायचे हे त्यांच्या लक्षात राहत नाही. मग वॉर्डातला पेशंट असेलतर त्यांच कस लक्षात रहायचं. डॉ.रॉयला आणि डॉ.साळवीना माहिती आहे की सिमा सावळेंच्या वॉर्डातला पेशंट असेलतर झोपडपट्‌टीतला असेल. नाही केलतर काय दंगा होतो. बील कमी कराव लागत का नाही कराव लागत. काय प्रिकॉशन्स घ्यायच हे त्यांना चांगल माहित होतं कारण की ते या शहरातले आहेत. तुम्ही त्यांना काय दिल याच्याशी मला काही घेणंदेणं नाही. तुम्ही जर त्यांना डीन केल असेलतर डीन पुरतच मर्यादीत राहू दया. त्यांना इकड आणु नका, त्यांना त्यांची जबाबदारी पार पाडू दया. ते कॉलेज एकदा चालू करा. जे काय आपण चालू करणार होतो त्यासाठी आपण जागा केली बाकी सगळया गोष्टीच्या निवीदा केल्या आणि आज जर आपण या दोघांना रिकाम करणार असालतर ते पण योग्य नाही आणि त्यांना सुध्दा काम दया. मगाशी अशाताई म्हणल्या की एका म्यानात दोन तलवारी का. मी म्हणल म्यानच काढुन टाकली ताई. ही तलवार नको आणि तीही तलवार नको. पण त्यातन निष्पन्न काय झालं. आम्ही मागच्यावेळेसच तुम्हांला सांगीतल होतं साहेब, की शहराचे दोन भाग करा. त्या दोघांकड समसमान जबाबदारी दया आणि दोघानाही काम करु दयात, तेही नाही केलं. आज तुम्ही तीसराच माणुस आणला. त्यामुळ या महापालिकेचा प्रत्येक कर्मचारी विचार करेल की मी कोणाच्या पाठीशी जायच का नाही जायच यांच समर्थन घ्यायच का नाही घ्यायचं. कारण वेळ आलीतर आम्ही कोणाच्याही पाठीशी राहत नाहीत ही भूमीका आमची योग्य नाही. त्यामुळे मा.महापौर साहेब, किमान तुम्ही नगरसेवक होतात आपल्याला माहिती तरी पाहीजे. तुम्हांला माहिती असेल तुम्ही मोठया पदावर आहेत म्हणुन. आता आम्ही पदावर नाहीत, नगरसेवक आहोत, कार्यकर्ते आहोत. नेत्यांनी कार्यकर्त्यांना सांगीतल पाहीजे. आमची अपेक्षा एवढीच आहे की

,

आम्हांला तुम्ही कळवा. हे जे काय दोन चार लोकांमध्ये चालल आहे ते बंद करा साहेब, हे जर तुम्ही नाही बंद केलनां, साहेब पुढच्या काळाच चित्र चांगल नसेल आणि राहूल जाधवांना चांगलच माहिती आहे. तुम्ही किती पण जोर लावा, नाहीच करायच ठरवलना तर नाहीच करु देणार. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, राजकारण मी पहीलही केलं नाही आणि आजही करणार नाही आणि याच्यापुढेही करु देणार नाही जे काही असेल ते सांगा, सांगा म्हणतो तुम्हांला, विचारा नाही म्हणल. मा.महापौर साहेब, दोन डॉक्टरांकडे तुम्ही जे काही त्यांच्याकड कुठलही पद ठेवल नाही, त्यांना तुम्ही रिकाम ठेवलेल आहे त्यांना तुम्ही काय करु देणार आहेत, त्यांचा काय विचार करणार आहेत. ते तुम्ही सांगायच आहे.

**मा.महापौर -** हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

(सभागृहात गोंधळ)

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३५२ विषय क्रमांक- ८

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.नरवि/कावि/०९/२२५/
२०१८ दि.१६/१०/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे वाकड तालुका मुळशी येथील स.नं. ८० पै. मधील मंजूर विकास योजनेतील ३६.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदरचा रस्ता विकसित केल्याने हिंजवडीकडे जाणे व येणेसाठी वाहतुक व्यवस्था सोयीस्कर होणेसाठी ३६.०० मी. रस्ता विकसित होणे आवश्यक आहे. मौजे वाकड-हिंजवडी या परिसरातील वाहतूक कोंडी समस्या दूर होऊन वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होणाऱ्या अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ मौजे वाकड येथील स.नं. ८० पै. मधील ३६.०० मी. रस्त्याने बाधित होणा-या जमिनीचे

,

भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी अथवा शासन निर्णय दि. १२/०५/२०१५ नुसार मनपाचे ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. निर्मला कुटे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सोनाली गव्हाणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ९

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र क्र.स्वभाअक/३/कावि/३१६/२०१८
दि.०१/११/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,९४,९६१/- व ९,१०,५४,९७४/- असे एकुण र. रु १४,०४,४९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१०/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे –

,

प्रपत्र “अ”

| महानगरपालिकेचे नाव | | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | शेरा |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १५१०२ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १५१०२ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १२२९० | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-११७६५ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- ७९२४<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३८४१ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ८५४७ लाभार्थी | GOI+GOM=५१२.८२लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १७०.९४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६८३.७६ लाख** | |

,

| | | | |
|---|---|---|---|
| निर्गत करणेत आलेलादुसरा हप्ता | ७६६१ लाभार्थी | GOI+GOM=४५९.६६लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१५३.२२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६१२.८८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत यावा.

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

(सभागृहात गोंधळ)

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, पुढीलप्रमाणे मी उपसूचना मांडतो- स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहर हागणदारी मुक्तीसाठी सामुदायिक व सार्वजनिक शौचालयात करण्यात येत असलेली सुधारणा व देखभाल दुरुस्ती तसेच शहरातील कोणताही नागरिक उघडयावर शौचास बसू नये याकरीता महानगरपालिका उपाययोजना करीत आहे. ODF+, ODF++ प्रमाणित शहर म्हणजे- शहरातील कोणताही नागरिक उघडयावर शौच/लघुशंका करत नाही तसेच शहरातील सामुदायिक व सार्वजनिक शौचालये स्वच्छ व सुस्थितीत आहेत. ODF+,ODF++ प्रमाणिकरण होणेसाठी मा.शासनाने दिलेल्या सूचना, निकष, घोषणापत्रानुसार व शहरात सर्व नागरिकांसाठी शौचालय सुविधा पुरेशी उपलब्ध असल्यामुळे व शासनाने नमुद केलेले सर्व निकष पुर्ण करीत असल्याने हरकती व सूचना मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार याबाबत कोणत्याही प्रकारच्या हरकती सूचना आलेल्या नसल्याने शासनाचे निकषनुसार प्रमाणीकरण करणेसाठी शासनास कळविणेस मान्यता देणेत यावी.

तसेच स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरास तीन तारांकित नामांकन (3 स्टार रेटींग) कचरा मुक्त शहर (गारबेज फ्री सिटी) करणे करीता उपाययोजना करीत आहे. पिंपरी चिंचवड शहर तीन तारांकित नामांकन (3 स्टार रेटींग) साठी शासनाने नमुद केलेले सर्व निकष पुर्ण करण्याकरीता प्रयत्नशील आहे. पिंपरी चिंचवड शहर कचरामुक्त शहर स्टार

,

रेटींगबद्दल काही सूचना व हरकती वर्तमानपत्रात जाहीर सूचना देऊन मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार याबाबत कोणत्याही प्रकारच्या हरकती सूचना आलेल्या नसल्याने शासनाचे निकषनुसार तीन तारांकित नामांकन (3 स्टार रेटींग) साठी प्रमाणीकरण करणेसाठी शासनास कळविणेस मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सोनाली गव्हाणे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ३५३ विषय क्रमांक- ९

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र क्र.स्वभाअक/३/कावि/३१६/२०१८ दि.०१/११/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,९४,९६१/- व ९,१०,५४,९७४/- असे एकुण र. रु १४,०४,४९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१०/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे –

,

**प्रपत्र “अ”**

| महानगरपालिकेचे नाव | | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | शेरा |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १५१०२ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १५१०२ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १२२९० | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-११७६५ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- ७९२४<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३८४१ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ८५४७ लाभार्थी | GOI+GOM=५१२.८२लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १७०.९४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६८३.७६ लाख** | |

,

| | | | |
|---|---|---|---|
| निर्गत करणेत आलेलादुसरा हप्ता | ७६६१ लाभार्थी | GOI+GOM=४५९.६६लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१५३.२२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६१२.८८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहर हागणदारी मुक्तीसाठी सामुदायिक व सार्वजनिक शौचालयात करण्यात येत असलेली सुधारणा व देखभाल दुरुस्ती तसेच शहरातील कोणताही नागरिक उघडयावर शौचास बसू नये याकरीता महानगरपालिका उपाययोजना करीत आहे. ODF+, ODF++ प्रमाणित शहर म्हणजे- शहरातील कोणताही नागरिक उघडयावर शौच/लघुशंका करत नाही तसेच शहरातील सामुदायिक व सार्वजनिक शौचालये स्वच्छ व सुस्थितीत आहेत. ODF+,ODF++ प्रमाणिकरण होणेसाठी मा. शासनाने दिलेल्या सूचना, निकष, घोषणापत्रानुसार व शहरात सर्व नागरिकांसाठी शौचालय सुविधा पुरेशी उपलब्ध असल्यामुळे व शासनाने नमुद केलेले सर्व निकष पुर्ण करीत असल्याने हरकती व सूचना मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार याबाबत कोणत्याही प्रकारच्या हरकती सूचना आलेल्या नसल्याने शासनाचे निकषनुसार प्रमाणीकरण करणेसाठी शासनास कळविणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरास तीन तारांकित नामांकन (3 स्टार रेटींग) कचरा मुक्त शहर (गारबेज फ्री सिटी) करणे करीता उपाययोजना करीत आहे. पिंपरी चिंचवड शहर तीन तारांकित नामांकन (3 स्टार रेटींग) साठी शासनाने नमुद केलेले सर्व निकष पुर्ण करण्याकरीता प्रयत्नशील आहे. पिंपरी चिंचवड शहर कचरामुक्त शहर स्टार रेटींगबद्दल काही सूचना व हरकती वर्तमानपत्रात जाहीर सूचना देऊन मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार याबाबत कोणत्याही प्रकारच्या हरकती सूचना आलेल्या नसल्याने शासनाचे

,

निकषनुसार तीन तारांकित नामांकन (3 स्टार रेटींग) साठी प्रमाणीकरण करणेसाठी शासनास कळविणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमत मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १०

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.भूमि/२/कावि/३३६/२०१८ दि.२/१०/२०१८

२) मा.आयुक्त यांचेकडील क्र.भुजि/०५/कावि/२४८/१८ दि.१९/११/२०१८ चे विषयपत्र मागे घेणेबाबतचे पत्र.

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताप्यात सध्या सुमारे २१०० बसेस आहेत. तसेच ताफ्यामध्ये नव्याने बसेस दाखल होणार आहेत. या सर्व बसेसचे पार्कींगसाठी महामंडळास जागा कमी पडत आहे. त्यामुळे शेकडो बसेसचे पार्कींग महामंडळास रस्त्यावर करावे लागत आहे. सार्वजनिक सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून सर्व बसेसचे पार्कींग संरक्षित जागेत होणे आवश्यक आहे. या बसेससाठी जागेची आवश्यकता आहे. मनपा हद्दीतील रिकाम्या झालेल्या पिंपरी येथील आ. क्र.११६ मधील ०.७९ हे पै.०.७३ हे. बस डेपोसाठी आरक्षित असलेली जागा बस/डेपो/ बसस्थानकाचे वापरासाठी कायदा, नगररचना विभाग यांचे अभिप्राय/अटी शर्तीस अधीन राहून पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांना ३० वर्ष कालावधीकरीता देणेस मान्यता देणे.

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता--

,

ठराव क्रमांक – ३५४ विषय क्रमांक- १०

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.भूमि/२/कावि/३३६/२०१८ दि.२/१०/२०१८

२) मा.आयुक्त यांचेकडील क्र.भुजि/०५/कावि/२४८/१८ दि.१९/११/२०१८ चे पत्र.

मा.आयुक्त यांचेकडील उपरोक्त संदर्भ क्रमांक २ चे पत्र क्र.भुजि/०५/कावि/२४८/१८ दि.१९/११/२०१८ चे पत्रातील मा.आयुक्त यांचे मागणीनुसार विषय क्रमाक १० वरील विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमत मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३५५ विषय क्रमांक- ११

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.नरवि/कावि/१५/३३६/२०१८ दि.०३/११/२०१८

दिनांक २७/८/२०१८ च्या फेरबदल प्रस्तावानुसार मे .अर्थस्केप आर्किटेक्ट व कन्सलटंट यांनी विषयांकित अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील मौजे पिंपरी वाघेरे येथिल आ .क्र .१३२ ) मनपा उपयोग ( यामध्ये भाजीमंडई व वाहनतळ या प्रयोजनार्थ, तसेच आ.क्र .११८) वाहनतळ ( यामध्ये १२ मी .रुंद रस्ता, भाजी मार्केट व हरित पट्टा या प्रयोजनार्थ, तसेच १२ मी .रुंद रस्ता यामध्ये १२ मी.रुंद रस्ता व भाजी मार्केट या प्रयोजनार्थ, तसेच शासकिय / निमशासकिय झोन यामध्ये किरकोळ दु कान मार्केट या प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेची मागणी केलेली आहे .पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीची सुधारित विकास योजना महाराष्ट्र

,

शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्रमांक टीपीएस-१८९३/१२७६/सीआर-१७४/९३/युडी-१३, दिनांक १८ सप्टेंबर १९९५ अन्वये मंजूर केलेली आहे. सदरच्या विकास योजनेमधिल आ .क्र .१३२ )मनपा उपयोग(, आ.क्र .११८) वाहनतळ (ही आरक्षणे मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेली असुन, सुधारित विकास योजनेतील १२ मी. रुंद रस्ता हा बहूंताश भागात विकसीत झालेला आहे. मे.अर्थस्केप आर्किटेक्ट व कंन्सलटंट यांचे उपरोक्त संदर्भिय पत्रासोबतच्या फेरबदल प्रस्तावानुसार फेरबदल करण्यासाठी खालिल प्रमाणे आरक्षणे व रस्ते यांचेमध्ये बदल करावा लागेल.

**प्रपत्र - अ**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेनुसार वापर

| अ.क्र. | आरक्षण क्र. / रस्ता / झोन | क्षेत्र चौ.मी. | सुधारित मंजूर विकास योजनेनुसार वापर |
|---|---|---|---|
| १ | आरक्षण क्र. ११८ | १५३२.८७ | वाहनतळ |
| २ | १२.०० मी. रुंद रस्ता. | ९१५.१५ | रस्ता. |
| ३ | शासकिय / निमशासकिय झोन | १९६८.८५ | शासकिय / निमशासकिय |
| | **एकुण क्षेत्र -** | **४४१६.८७ चौ.मी.** | |

**प्रपत्र – ब**

मे. अर्थस्केप आर्किटेक्ट व कंन्सलटंट यांनी दिनांक २७/०८/२०१८ रोजीच्या प्रस्तावानुसार फेरबदल

| अ.क्र. | मुळ आरक्षण क्र./रस्ता/ झोन | फेरबदल प्रस्तावानुसार प्रस्तावित वापर | फेरबदल प्रस्तावानुसार प्रस्तावित क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | आ. क्र. ११८ ( वाहनतळ ) | १) १२.०० मी. रुंद रस्ता | ८४०.९५ चौ.मी. |
| | | २) ओटा भाजी मंडई | २८९.६० चौ.मी. |
| | | ३) फळ मार्केट | ३१८.९७ चौ.मी. |
| | | ४) हरित पट्टा | ८३.३५ चौ. मी. |
| | | एकण क्षेत्र - | **१५३२.८७ चौ. मी.** |

,

| | | | |
|---|---|---|---|
| २ | १२.०० मी. रुंद रस्ता | १) १२.०० मी. रुंद रस्ता | १६७.०० चौ.मी. |
| | | २) फळ मार्केट | ५३१.०० चौ.मी. |
| | | ३) १२.०० मी. रुंद रस्ता | २१७.१५ चौ. मी. |
| | | एकण क्षेत्र - | **९१५.१५ चौ. मी.** |
| ३ | शासकिय / निमशासकिय झोन | किरकोळ दुकानाची मंडई | **१९६८.८५ चौ. मी.** |

तरी वरिल प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेनुसार प्रपत्र अ मध्ये दर्शविलेल्या आरक्षण, रस्ता व झोन यामध्ये मे. अर्थस्केप आर्किटेक्ट व कंन्सलटंट यांनी दिनांक २७/०८/२०१८ रोजीच्या प्रस्तावानुसार सादर प्रपत्र ब दर्शविलेल्या आरक्षण, रस्ता व झोन यामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाच्या फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.माधुरी कुलकर्णी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३५६ विषय क्रमांक- १२

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.नगरसचिव

<u>विधी समिती</u>

अ) दि.०५/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१९/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

,

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.माधुरी कुलकर्णी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३५७ विषय क्रमांक- १३

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि.३/१०/२०१८, दि. ५/१०/२०१८ व दि.६/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.माधुरी कुलकर्णी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३५८ विषय क्रमांक- १४

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.११/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२६/०९/२०१८, दि.२९/०९/२०१८, दि.९/१०/२०१८ व दि.१२/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

,

**मा.माधुरी कुलकर्णी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३५९ विषय क्रमांक- १५

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

अ) दि.२८/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१२/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.माधुरी कुलकर्णी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३६० विषय क्रमांक- १६

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.नगरसचिव

**<u>शिक्षण समिती</u>**

अ) दि.०४/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१९/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

,

**मा. महापौर** – सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(राहुल गुलाब जाधव)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/३५/२०१९
दिनांक - २३/१/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

,